पश्चिम विदर्भातील सर्वाधिक अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ● वर्ष १६ ● अंक ३६ ● मंगळवार, दि. ११ ऑगस्ट २०२६ ● मूल्य ५ ● पृष्ठे ८

RNI No.- MAHMAR/2012/49642 ■ Postal Regn. No. AKL DN/283/2024-26 ■ Web. https://epaper.citynewssuperfast.com

**सुविचार**

कारण सांगणारी लोकं
यशस्वी होत नाहीत आणि,
यशस्वी होणारे लोक
कारण सांगत नाहीत




# महाराष्ट्रात आजपासून दूध महागलं!

## गायीच्या दुधासाठी 62, तर म्हशीच्या दुधासाठी 78 रुपये

प्रतिनिधी ११ ऑगस्ट

**मुंबई :** महागाईने त्रस्त असलेल्या सर्वसामान्यांच्या घरगुती बजेटवर आणखी एक भार पडला आहे. महाराष्ट्रात आज, ११ ऑगस्ट २०२६ पासून गायीच्या आणि म्हशीच्या दुधाच्या दरात प्रतिलिटर २ रुपयांनी वाढ झाली आहे. त्यामुळे गायीचे दूध ६० रुपयांवरून ६२ रुपये, तर म्हशीचे दूध ७६ रुपयांवरून ७८ रुपये प्रतिलिटर झाले आहे.

दूध उत्पादक आणि दूध प्रक्रिया उद्योगाच्या कल्याणासाठी काम करणाऱ्या संघटनेच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला.दुधाच्या दरवाढीचा परिणाम केवळ पिशवीतील दूध खरेदीवर होणार नसून दही, ताक, लोणी, पनीर, चीज, तूप, फ्लेवर्ड मिल्क आणि दुधापासून तयार होणाऱ्या मिठाईच्या किमतींवरही होण्याची शक्यता आहे. या दुग्धजन्य पदार्थांच्या दरात सुमारे १० टक्क्यांपर्यंत वाढ होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. नव्या दरांनुसार गायीच्या दुधासाठी आता ग्राहकांना प्रतिलिटर ६२ रुपये मोजावे लागतील.

यापूर्वी हा दर ६० रुपये होता. त्याचप्रमाणे म्हशीच्या दुधाचा दर ७६ रुपयांवरून ७८ रुपये प्रतिलिटर करण्यात आला आहे. ही दरवाढ ११ ऑगस्टपासून राज्यभर लागू करण्यात आली आहे. त्यामुळे दररोज दूध खरेदी करणाऱ्या कुटुंबांच्या मासिक खर्चात थोडीशी



वाढ होणार आहे. विशेषतः मोठ्या कुटुंबांमध्ये किंवा दररोज अधिक दूध वापरणाऱ्या घरांमध्ये याचा परिणाम अधिक जाणवू शकतो. दरम्यान, राज्यात गेल्या काही काळात समोर आलेल्या दूध भेसळीच्या घटनांच्या पार्श्वभूमीवर ही दरवाढ होत असल्याने त्याची चर्चा सुरू झाली आहे.

अन्न व औषध प्रशासनाने राज्यातील विविध भागांत दूध भेसळ आणि कृत्रिम दूध निर्मितीविरोधात मोठ्या प्रमाणावर कारवाया केल्या आहेत. धाराशिवमधील एका प्रकरणाच्या तपासादरम्यान राज्यात मोठ्या प्रमाणात संशयित भेसळयुक्त दूध वितरित झाल्याचा संशय तपास यंत्रणेकडून व्यक्त करण्यात आला होता. त्यानंतर जुलैमध्ये राज्यातील काही जिल्ह्यांत झालेल्या कारवाईत कृत्रिम दूध तयार करणारे जाळे उघडकीस आले.

### दूध महागण्यामागे कारण काय?

दूध उत्पादक आणि प्रक्रिया उद्योगाच्या संघटनेनुसार, दूध उत्पादनापासून ते ग्राहकांपर्यंत पोहोचवण्यापर्यंतचा खर्च सातत्याने वाढत आहे. पशुखाद्य, जनावरांची देखभाल, दूध संकलन, प्रक्रिया, पॅकेजिंग आणि वाहतूक या सर्वच टप्प्यांवरील खर्च वाढल्यामुळे दूध उत्पादक आणि डेअरी उद्योगावर आर्थिक दबाव निर्माण झाला आहे. विशेषतः वाहतूक खर्च वाढल्याने दूध वितरण व्यवस्थेचा खर्च वाढला आहे. डिझेलच्या किमतीतील वाढीचाही त्यावर परिणाम झाल्याचे संघटनेकडून सांगण्यात आले आहे. त्याचबरोबर दुधाच्या पॅकेजिंगसाठी लागणाऱ्या साहित्याच्या किमतीतही मोठी वाढ झाली आहे.दूध उत्पादकांना योग्य मोबदला मिळावा आणि दूध प्रक्रिया उद्योगाचा वाढता खर्च भरून काढता यावा, यासाठी दरवाढ करणे आवश्यक असल्याची भूमिका संघटनेने घेतली आहे.

### पनीरही महागणार

दुधाच्या मूळ दरात वाढ झाल्यानंतर त्यापासून तयार होणाऱ्या पदार्थांच्या किमतींवरही त्याचा परिणाम होणार आहे. त्यामुळे येत्या काही दिवसांत दही, ताक, लोणी, पनीर, चीज, तूप, फ्लेवर्ड मिल्क आणि दुधाच्या मिठाईच्या किमती वाढण्याची शक्यता आहे. या पदार्थांच्या दरात सुमारे १० टक्क्यांपर्यंत वाढ होऊ शकते. त्यामुळे श्रावण आणि त्यानंतर येणाऱ्या सण-उत्सवांच्या काळात ग्राहकांच्या खिशावर अतिरिक्त भार पडण्याची शक्यता आहे.दूध आणि दुग्धजन्य पदार्थ हे भारतीय कुटुंबांच्या दैनंदिन आहाराचा महत्त्वाचा भाग असल्याने या दरवाढीचा परिणाम थेट घरगुती अर्थसंकल्पावर होणार आहे.

## »थोडक्यात

### साप-विंचू सोडा

**मुंबई :** गडचिरोली जिल्ह्यात सर्पदंशामुळे तीन आदिवासी विद्यार्थिनींचा मृत्यू झाल्याच्या अत्यंत धक्कादायक घटनेवर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे खासदार संजय राऊत यांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे. 'आदिवासी बांधवांनी आता जंगलातले साप आणि विंचू पकडून या मंत्र्यांच्या घरात आणि मुख्यमंत्र्यांच्या 'वर्षा' बंगल्यावर सोडावेत, तेव्हाच यांना मृत्यूचे भय काय असते ते समजेल,' असे आक्रमक विधान संजय राऊत यांनी पत्रकार परिषदेत केले.

### भूकंपाचे धक्के

**नाशिक :** नाशिकसह पालघर जिल्ह्यात गेल्या पंधरा दिवसांपासून अधूनमधून भूकंपाचे धक्के जाणवत असल्याने नागरिकांमध्ये पुन्हा भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. सोमवारी मध्यरात्री जव्हार-विक्रमगड परिसराला सलग तीन भूकंपाचे धक्के जाणवले. यातील दोन धक्क्यांची तीव्रता ३.२ आणि ३.४ रिश्टर स्केल इतकी नोंदवण्यात आली असून, रात्री १२ वाजून ५ मिनिटांच्या सुमारास जाणवलेल्या आणखी एका धक्क्याची नोंद उपलब्ध झालेली नाही.

### सरपंचाची आत्महत्या

**बुलढाणा :** बुलढाणा जिल्ह्यातील संग्रामपूर तालुक्यातून एक धक्कादायक घटना समोर आली आहे. करमोडा ग्रामपंचायतीचे विद्यमान लोकनियुक्त सरपंच दीपक प्रकाश उगले यांनी आपली जीवनयात्रा संपवल्याची घटना घडली आहे. या घटनेमुळे संग्रामपूर परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. दीपक उगले यांनी स्वतःच्या शेतात हे टोकाचे पाऊल उचलले. आपले जीवन संपवण्यापूर्वी त्यांनी एक व्हिडीओ तयार करून तो समाजमाध्यमांवर प्रसारित केल्याचे सांगण्यात येत आहे. या व्हिडीओमध्ये त्यांनी 'राजकीय विरोधकांच्या धमक्यांना व त्रासाला कंटाळून मी माझं जीवन संपवत आहे', अशा आशयाचे वक्तव्य केल्याची माहिती आहे.

# बिल्डर जीम ट्रेनर प्रकरणात खदान पोलिसांची चुप्पी

## एसपी अर्चित चांडकांनी करावी चौकशी

प्रतिनिधी ११ ऑगस्ट

**अकोला:** अकोल्यात एका प्रसिद्ध बिल्डर आणि त्याच्या फीमेल पर्सनल जिम ट्रेनरच्या नात्यावरून मोठा वाद पेटला आहे. ट्रेनिंगच्या नावाखाली भलताच प्रकार सुरू असल्याची चर्चा बाजारपेठेत आहे. पण, या सर्व प्रकरणात आम्ही वारंवार खदान पोलिसांसोबत संपर्क केला पण,त्यांनी या सर्व प्रकरणात चुप्पी साधली आहे. तक्रारीची चौकशी कुठवर आली आणि कोणावर कारवाई केली याची माहिती खदान पोलिस देणे टाळत आहे.

अकोला शहरात सध्या एका प्रायव्हेट जिमवरून जोरदार चर्चा रंगली आहे. एका नामांकित बिल्डरने नियुक्त केलेल्या फीमेल जिम ट्रेनरवर आणि या संपूर्ण प्रकारावर गंभीर संशय व्यक्त केला जात आहे. इतर सर्टिफाइड






ट्रेनर्सच्या तुलनेत या ट्रेनरला ३०० टक्के जास्त फी दिली जात असल्याचा दावा आर आर सी ला प्राप्त पत्रात करण्यात आला आहे. नगण्य अनुभव असतानाही या ट्रेनरवर एवढी मेहेरबानी का ? की ट्रेनिंगच्या नावाखाली भलतेच काही शिजतेय ? अशा अनेक प्रश्नांमुळे अकोल्यातील फिटनेस क्षेत्रात सध्या खळबळ उडाली आहे. आर आर सी ला प्राप्त पत्रात अनेक गोष्टींचा खुलासा करण्यात आला आहे.

तर दूसरीकडे या सर्व प्रकरणात खदान पोलिस मुग गिळून बसली आहे. या सर्व प्रकरणात ज्याच्या विरोधात तक्रार करण्यात आली त्या तक्रारीचे पुढे काय झाले याची खातरजमा पोलिस अधीक्षकांनी करण्याची गरज आहे. ज्याने कोणी व्हिडीओ,फोटो व्हायरल केले त्याच्यावर कारवाई का करण्यात येत नाही. या सर्व प्रकरणात पोलिस अधीक्षकांनी ठाणेदाराची चौकशी केल्यास नवे घबाड बाहेर निघण्याची भिती व्यक्त केली जात आहे.

# लोकांनी खाणं सोडलं की विक्री थांबेल'

## अन्न व औषध प्रशासनाचे सहाय्यक आयुक्तांचा अजब दावा

प्रतिनिधी ११ ऑगस्ट

**अकोला :** अकोल्यातील तेल्हारात अन्न व औषध प्रशासनाने धडक कारवाई करत ४ लाख ८४ हजार रुपयांचा प्रतिबंधित गुटखा आणि मॅक्झिमो वाहन जप्त केले. एकाला ताब्यात घेतले असले तरी, जिल्ह्यात सर्रास गुटखा मिळत असताना सहाय्यक आयुक्त देवानंद वीर यांच्या बेजबाबदार विधानामुळे वादाला तोंड फुटले आहे. राज्य सरकारने गुटखा बंदी केली आहे. असे असताना त्याची अमलबजावणी विभागाने करणे अपेक्षित आहे. पण, तसे होताना दिसत नाही. अकोला जिल्ह्यातील तेल्हारा शहरात अन्न व औषध प्रशासनाने बेकायदेशीर गुटखा तस्करीविरोधात मोठी कारवाई केली आहे. मध्यरात्री १२ वाजता टाकलेल्या धाडीत तब्बल ४ लाख ८४ हजार रुपये किमतीचा प्रतिबंधित गुटखा आणि वाहतुकीसाठी वापरण्यात आलेले मॅक्झिमो वाहन जप्त करण्यात आले. या कारवाईत एका संशयित आरोपीला ताब्यात घेण्यात आले असून पुढील कायदेशीर प्रक्रिया सुरू आहे.राज्यात गुटखा विक्रीवर अधिकृत कायदेशीर बंदी आहे. बंदी असलेल्या पदार्थाचा अवैध पुरवठा रोखणे, सीमांवर नाकेबंदी करणे आणि गुटखा सप्लायर्स आणि माफियांना लगाम लावणे ही पूर्णपणे एफ डी ए आणि पोलीस प्रशासनाची घटनात्मक जबाबदारी आहे. 'लोकांनी खाणं सोडलं की विक्री थांबेल' असा युक्तिवाद करणे म्हणजे प्रशासनाने स्वतःच्या लाचारीची आणि निष्क्रीयतेची जाहीर कबुली देण्यासारखे आहे.

> 'जिल्ह्यात स्वतंत्र पोलीस किंवा सुरक्षा दल नसताना आणि केवळ ३ अधिकाऱ्यांच्या बळावर आम्ही सातत्याने कारवाया करत आहोत. जनता, पत्रकार आणि विविध सूत्रांकडून मिळणाऱ्या माहितीच्या आधारे पुढील कारवाया केल्या जात आहेत,' गुटख्याच्या मागणी आणि पुरवठ्यावर बोलताना ते म्हणाले, 'जोपर्यंत मागणी आहे तोपर्यंत पुरवठा होतो असे म्हटले जाते. त्यामुळे नागरिकांनी आणि गुटखाप्रेमींनी स्वतःहून गुटख्याचे सेवन बंद केले, तर ही अवैध विक्री आपोआप थांबेल.'प्रशासनाकडून येत्या काळातही गुटखा माफियांविरोधात अशीच कठोर भूमिका घेतली जाईल, असा इशारा त्यांनी दिला आहे.
>
> -देवानंद वीर सहाय्यक आयुक्त,
> अन्न व औषध प्रशासन,अकोला.



**लढा जनतेचा... लढा हक्काचा !-** 'आवाज दाबता येईल, पण जनतेचा प्रश्न आणि संघर्ष थांबवता येणार नाही !' असे म्हणत शिवसेना युवा नेते सामाजिक कार्यकर्ता व नगरसेवक सागर भारुका यांनी अन्यायी निलंबनाच्या निषेधार्थ आज ११ ऑगस्ट रोजी एकदिवसीय उपोषण केले.




# शिक्षक निलंबनात उघड भेदभाव !

## सोयीच्यांना अभय, इतरांचा बळी ?

प्रतिनिधी ११ ऑगस्ट

**अकोला :** अकोला जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागात शिक्षक बदली घोटाळ्यावरून सुरू असलेला सावळागोधळ आता पराकोटीला पोहोचला आहे.बदली प्रकरणातील दोषींवर कारवाई करताना प्रशासनाने व शिक्षणाधिकाऱ्यांनी थेट 'चेहरा पाहून' निलंबनाची कुऱ्हाड चालवल्याचा खळबळजनक प्रकार समोर आला आहे. शिक्षणाधिकाऱ्यांच्या नजीकच्या आणि मर्जीतील शिक्षकांना कारवाईतून अलगद वाचवण्यात आले असून, या संपूर्ण निलंबन प्रक्रियेत प्रचंड भेदभाव झाल्याचा गंभीर आरोप आता जोर धरू लागला आहे.

बदली घोटाळ्याची सखोल चौकशी करण्यासाठी समिती गठीत करण्यात आली होती. मात्र, चौकशी समितीचा अधिकृत अहवाल धाब्यावर बसवून केवळ मनमानी कारभाराच्या जोरावर ही कारवाई उरकण्यात आल्याचे स्पष्ट दिसत आहे.

### अकोला जिल्हा परिषद सीईओ चौकशी करणार का ?

शिक्षक पती-पत्नी एकत्रिकरणासाठी सादर केलेल्या प्रमाणपत्रांच्या तपासणीत शिक्षणाधिकाऱ्यांनी दुटप्पी धोरण राबवले.मर्जीतील लोकांना अभय: ठराविक शिक्षकांची तीच प्रमाणपत्रे 'वैध' ठरवून त्यांचे निलंबन टाळण्यात आले, तर इतरांची तीच प्रमाणपत्रे तडकाफडकी 'अवैध' ठरवून त्यांना निलंबित करण्यात आले.चौकशी अहवाल आणि निलंबनाची मूळ फाईल समोरासमोर ठेवून निष्पक्ष तपास केल्यास शिक्षण विभागातील मोठे मासे गळाला लागण्याची शक्यता आहे.

### 'लाडक्या' ११ शिक्षकांवर खास मेहेरबानी

निलंबनाच्या कारवाईनंतर संबंधित कर्मचाऱ्यांचे मुख्यालय निश्चित करताना प्रशासनाने पारदर्शकतेचा पूर्णपणे बोजवारा उडवला आहे. निलंबित करण्यात आलेल्यां ३३ पैकी ११ अत्यंत जवळच्या शिक्षकांना त्याच तालुक्यात किंवा सोयीच्या ठिकाणी मुख्यालय बहाल करण्यात आले आहे. विशेष म्हणजे या ११ जणांमध्ये पती-पत्नी शिक्षकांचाच भरणा आहे. दुसरीकडे, कोणतीही गॉडफादर नसलेल्या इतर निलंबित शिक्षकांना मात्र मूळ कार्यक्षेत्राबाहेर दूरवरच्या तालुक्यांमध्ये फेकून देण्यात आले.एकाच स्वरूपाच्या गुन्ह्यात आणि समान कारवाईत मुख्यालयाचे हे दुटप्पी निकष का ? मर्जीतील ११ शिक्षकांना सोयीचे ठिकाण देण्यासाठी कोणत्या 'विशेष' प्रशासकीय निकषांची देवाणघेवाण झाली, असा जळजळीत सवाल आता विचारला जात आहे.

### सीईओंची चुप्पी... उत्तर देण्याचे टाळले

शिक्षण विभागातील या उघड्या बोगसगिरीबाबत 'आरआरसी न्यूज' व 'सिटी न्यूज सुपरफास्ट' च्या प्रतिनिधींनी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांशी वारंवार संपर्क साधून त्यांची बाजू जाणून घेण्याचा प्रयत्न केला. मात्र, सीईओ यांनी या संपूर्ण प्रकरणावर मौन बाळगणेच पसंत केले.प्रशासकीय प्रमुखांची ही गूढ शांतता कुणाला वाचवण्यासाठी आहे ? की या बदली आणि निलंबन घोटाळ्याचे धागेदोरे वरिष्ठ पातळीपर्यंत पोहोचलेले आहेत, म्हणून हा सगळा झाकपाक सुरू आहे ? या प्रश्नांचे उत्तर अकोल्यातील जनता व प्रामाणिक शिक्षक आता मागत आहेत.



# डिलिमिटेशन विधेयकाचे देशव्यापी महत्त्व

लोकसभा आणि राज्य विधानसभा मतदारसंघांच्या पुनर्रचना प्रक्रियेला (Delimitation) भारतीय राजकारणात एक ऐतिहासिक वळण मानले जात आहे. भारतीय संविधानाच्या कलम ८२ आणि १७० अन्वये दर १० वर्षांनी जनगणनेनंतर मतदारसंघांचे पुनर्रचिमीकरण करणे अपेक्षित असले, तरी १९७६ मधील ४२ व्या आणि २००१ मधील ८४ व्या घटनादुरुस्तीने १९७१ च्या जनगणनेच्या आधारे जागांची संख्या २०२६ नंतरच्या पहिल्या जनगणनेपर्यंत गोठवली होती. आता २०२६ नंतर राबवल्या जाणाऱ्या सीमांकन/पुनर्रचना विधेयकामुळे (Delimitation Bill) संपूर्ण भारताच्या सामाजिक, राजकीय आणि संघराज्यीय चौकटीवर मोठे आणि दूरगामी परिणाम होणार आहेत.

**१. संसदेच्या सदस्यसंख्येत मोठी वाढ आणि नवीन रचनेचा आकार लोकसभेची सध्याची**

सदस्यसंख्या ५४३ आहे. नव्या सीमांकन प्रक्रियेनंतर लोकसभेतील जागांची संख्या वाढून ती ८०० ते ८५० च्या दरम्यान (काही प्रस्तावांमध्ये ८१६ जागा) जाण्याची शक्यता आहे.

अनुसूचित जाती व जमाती (SC/ST) चे प्रतिनिधित्व: लोकसंख्या वाढीच्या प्रमाणानुसार एससी (SC) राखीव जागा ८४ वरून १३६ पर्यंत आणि एसटी (ST) राखीव जागा ४७ वरून ७० च्या आसपास वाढण्याचा अंदाज आहे. महिला आरक्षणाची अंमलबजावणी: १०६ व्या घटनादुरुस्तीनुसार ('नारी शक्ती वंदन अधिनियम') महिलांना ३३% आरक्षण सीमांकन प्रक्रियेनंतरच लागू होणार आहे. त्यामुळे नव्या लोकसभेत सुमारे २७३ महिला खासदार संसदेत पोहोचतील.

**२. उत्तर विरुद्ध दक्षिण: राजकीय शक्तीचे हस्तांतरण (North-South Divide)**

डिलिमिटेशनचा सर्वात मोठा राजकीय आणि संवेदनशील परिणाम म्हणजे उत्तरेकडील आणि दक्षिणेकडील राज्यांमधील राजकीय शक्तीचे संतुलन बदलणे: उत्तरेकडील राज्यांचा राजकीय प्रभाव वाढणार: उत्तर प्रदेश, बिहार, मध्य प्रदेश आणि राजस्थान या राज्यांमध्ये लोकसंख्या वाढीचा दर जास्त राहिला आहे. त्यामुळे केवळ लोकसंख्येच्या आधारावर पुनर्रचना झाल्यास उत्तर प्रदेशातील लोकसभेच्या जागा ८० वरून १४०+ पर्यंत, तर



बिहारच्या जागा ४० वरून ७०-८० पर्यंत वाढू शकतात. दक्षिण भारताची भीती आणि नुकसान: तमिळनाडू, केरळ, कर्नाटक, आंध्र प्रदेश आणि तेलंगणा या दक्षिण भारतीय राज्यांनी कुटुंब नियोजन आणि लोकसंख्या नियंत्रण धोरणे यशस्वीपणे राबवली. परंतु, केवळ लोकसंख्येचा निकष लावल्यास संसदेतील त्यांचा एकंदरीत टक्केवारीतील वाटा कमी होईल. संघराज्यीय संतुलनाला तडा: दक्षिणेकडील राज्यांची अशी भावना आहे की, कुटुंब नियोजन यशस्वी केल्याची त्यांना राजकीय 'शीक्षा' मिळत आहे, तर लोकसंख्या न नियंत्रणात ठेवणाऱ्या राज्यांना अधिक राजकीय सत्ता दिली जात आहे.

**३. महाराष्ट्रावर होणारा थेट परिणाम**

महाराष्ट्राची सध्याची लोकसभा सदस्यसंख्या ४८ आहे. सीमांकन विधेयकाच्या अंमलबजावणीच्या पद्धतीनुसार महाराष्ट्राबाबत दोन मुख्य शक्यता वर्तवल्या जात आहेत: एकसमान ५०% वाढ केल्यास: सर्व राज्यांमध्ये ५०% जागा वाढवल्यास महाराष्ट्रातील लोकसभेच्या जागा ४८ वरून ७२ होतील. २०११/नव्या जनगणनेनुसार जागा ठरवल्यास: लोकसंख्येच्या प्रमाणात थेट वाटप झाल्यास महाराष्ट्रातील जागा ७९ पर्यंत वाढू शकतात. परंतु, उत्तरेतील राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्रातील लोकसंख्या वाढीचा दर नियंत्रित असल्याने देशाच्या एकूण राजकीय सत्तेत महाराष्ट्राचे वजन तुलनेने स्थिर किंवा किंचित कमी होण्याचे आव्हान निर्माण होऊ शकते.

**४. आर्थिक आणि वित्तीय वाटपावर परिणाम**

लोकसभेतील जागांचा आणि राजकीय प्रभावाचा थेट संबंध केंद्रीय निधीच्या वाटपाशी येतो: वित्त आयोगाची सूत्रे (Finance Commission): केंद्र सरकारकडून राज्यांना मिळणाऱ्या कर महसुलाच्या वाटपात लोकसंख्या हा एक महत्त्वाचा घटक असतो. आर्थिक योगदान विरुद्ध राजकीय अधिकार: दक्षिण भारतीय राज्ये आणि महाराष्ट्र हे देशाच्या जीडीपीमध्ये (GDP) आणि कर संकलनात सर्वात मोठा वाटा उचलतात. संसदेतील प्रतिनिधित्व कमी झाल्यास धोरणात्मक निर्णय आणि निधी वाटपात या प्रगत राज्यांच्या आवाजाला कमी महत्त्व दिले जाण्याची शक्यता निर्माण होते.

# झाडांची गटींग : शेतकरी आणि बागप्रेमींसाठी एक प्रभावी पद्धत

झाडांची वंशवृद्धी करण्यासाठी आणि मातृवृक्षासारखीच (Parent Plant) उत्तम फळे, फुले मिळवण्यासाठी 'गुटी कलम' (Air Layering) ही एक अत्यंत लोकप्रिय आणि यशस्वी वनस्पती प्रसार पद्धत आहे. विशेषतः ज्या वनस्पतींच्या फांद्या जमिनीपर्यंत सहज वाकवता येत नाहीत, त्यांच्यासाठी गुटी कलम ही सर्वोत्तम पद्धत मानली जाते.

गुटी कलम म्हणजे काय?

झाडाच्या एका निरोगी फांदीवरील सालीचा काही भाग काढून तेथे माती, कोकोपीट किंवा स्फॅग्नम मॉस लावून ओलसरपणा टिकवून ठेवला जातो. काही दिवसांनंतर त्या ठिकाणी नवीन मुळे फुटतात. मुळे छान वाढल्यानंतर ती फांदी मातृवृक्षापासून वेगळी करून कुंडीत किंवा जमिनीत लावली जाते. यालाच गुटी कलम असे म्हणतात. गुटी कलमासाठी योग्य वेळ आणि वनस्पती

योग्य वेळ: पावसाळा (जून ते सप्टेंबर) हा गुटी कलमासाठी सर्वात उत्तम काळ मानला जातो. या दिवसांत हवेतील आर्द्रता जास्त असल्याने मुळे लवकर आणि चांगल्या प्रकारे फुटतात.

उपयुक्त झाडे: डाळिंब, पेरू, कागदी लिंबू, संत्री, चिकू, आंबा, अंजीर, लीची, तसेच मोगरा, जास्वंद आणि बोगनव्हेलिया यांसारखी फुलझाडे.

लागणारे साहित्य

१. धारदार सुरी किंवा ब्लेड



(निर्जंतुक केलेले)

२. स्फॅग्नम मॉस (Sphagnum Moss) किंवा कोकोपीट / शेणखत मिसळलेली माती

३. पारदर्शक प्लास्टिक पिशवी (सुमारे १५ ते २० सेमी)

४. सुतळी किंवा सुती धागा

५. रूटिंग संप्रेरक / पावडर (Rooting Hormone) (पर्यायी, मुळे लवकर येण्यासाठी उपयुक्त)

गुटी कलम करण्याची टप्प्याटप्प्याने पद्धत

**१. फांदीची निवड:** झाडावरील १ ते २ वर्षे वयाची, पेन्सिलइतक्या जाडीची आणि निरोगी (रोगमुक्त) फांदी निवडावी. फांदी सरळ आणि सूर्याचा प्रकाश मिळणाऱ्या बाजूला असावी.

**२. साल काढणे:** निवडलेल्या फांदीवर पानांच्या गाठीच्या खाली सुमारे २ ते ३ सेमी रुंदीचा वर्तुळाकार (Ring cut) भाग सुरीने कापून त्याची साल पूर्णपणे काढून टाकावी. आतील लाकडी भागावरचा हिरवा/गुळगुळीत थर सुरीने हलकेच खरवडून घ्यावा.

**३. रूटिंग संप्रेरक लावणे (पर्यायी):** सालीचा भाग काढलेल्या जागेवर रूटिंग पावडर लावल्यास मुळे फुटण्याची प्रक्रिया जलद होते.

**४. गुटी बांधणे:** भिजवलेले स्फॅग्नम मॉस किंवा ओलसर कोकोपीट/मातीचा गोळा त्या साल काढलेल्या भागाभोवती व्यवस्थित बसवावा. त्यानंतर पारदर्शक प्लास्टिक पिशवीने तो गोळा पूर्णपणे झाकून घ्यावा.

**५. हवाबंद बांधणे:** प्लास्टिकच्या दोन्ही बाजू सुतळीने घट्ट बांधाव्यात, जेणेकरून आतील ओलावा बाहेर जाणार नाही आणि बाहेरची हवा किंवा पाणी आत शिरणार नाही.

काळजी आणि काढणी

मुळे येण्याचा काळ: साधारणपणे ३० ते ६० दिवसांत पारदर्शक प्लास्टिकमधून पांढरी किंवा तपकिरी मुळे वाढलेली स्पष्ट दिसू लागतात.

रोप वेगळे करणे: मुळांची चांगली वाढ झाल्यावर, बांधलेल्या गुटीच्या खालच्या बाजूने फांदी सुरीने किंवा कात्रीने कापून वेगळी करावी.

प्लास्टिक काढणे: कापलेली फांदी आणून प्लास्टिक हळुवारपणे काढून टाकावे (मातीचा गोळा फुटणार नाही याची काळजी घ्यावी).

# खुदीराम बोस यांची आज पुण्यतिथी

भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील सर्वात तरुण हुतात्मा खुदीराम बोस यांची पुण्यतिथी ११ ऑगस्ट रोजी पाळली जाते. ब्रिटिश राजवटीविरुद्ध अदम्य साहस दाखवत, वयाच्या अवघ्या १८ व्या वर्षी ११ ऑगस्ट १९०८ रोजी त्यांनी मुजफ्फरपुर कारागृहात हसतहसत फाशीचा फंदा स्वीकारला. ३ डिसेंबर १८८९ रोजी पश्चिम बंगालमधील मिदनापुर जिल्ह्यातील हबीबपूर गावात. बालपण: बालपणीच आई-वडिलांचे छत्र हरपले. मोठ्या बहिणीने त्यांचा सांभाळ केला. अरबिंदो घोष आणि सिस्टर निवेदिता यांच्या भाषणांतून प्रेरित होऊन ते बाल्यावस्थेतच गुप्त क्रांतिकारी संघटना 'अनुशीलन समिती'त दाखल झाले. मुजफ्फरपूर प्रकरण आणि ऐतिहासिक घटना लक्ष्य, ब्रिटीश न्यायधीश डगलस किंग्सफोर्ड हा भारतीय कार्यकर्त्यांना अमानुष व कठोर शिक्षा देण्यासाठी कुख्यात होता. किंग्सफोर्डच्या गाडीवर ३० एप्रिल १९०८ रोजी प्रफुल्ल चाकी यांच्यासह खुदीराम यांनी बॉम्बफेक केली. दुर्दैवाने त्या गाडीत किंग्सफोर्ड नसून दोन ब्रिटिश महिला होत्या, ज्यांचा मृत्यू झाला. प्रफुल्ल चाकी यांनी स्वतःवर गोळी झाडून घेत बलिदान दिले, तर खुदीराम बोस यांना पोलिसांनी अटक केली. खटल्यादरम्यान खुदीराम यांनी सर्व जबाबदारी स्वतःवर घेतली. फाशी सुनावल्यावर त्यांच्या चेहऱ्यावर तिळमात्र भीती नव्हती. ११ ऑगस्ट १९०८ रोजी हातात भगवद्गीता घेऊन ते अत्यंत निर्भयपणे फाशीच्या तख्तावर चढले.त्यांच्या या बलिदानामुळे देशभरात क्रांतीची नवी लाट पसरली. त्यांचा हा प्रेरणादायी इतिहास आजही देशवासीयांच्या मनात राष्ट्रभक्तीची ज्योत तेवत ठेवतो. खुदीराम बोस यांचे अदम्य साहस आणि तरुण वयातील खुदीराम बोस यांच्या बलिदानामुळे देशाच्या स्वातंत्र्य चळवळीला वेगळी दिशा मिळाली. स्वातंत्र्याचे स्फुल्लिंग अधिक तेजाने तळपू लागले. खुदीराम बोस यांच्या सारख्या क्रांतिकारकांमुळे देशातील अन्य क्रांतिकारकांना प्रेरणा मिळाली.



# प्राध्यापक पदभरती पारदर्शक व्हावी

डॉ.बाबासाहेब आंबेडकर टिचर्स असोसिएशन (डाटा) अमरावतीच्या वतीने उच्च शिक्षण संचालकांना निवेदन देऊन महाराष्ट्र राज्यातील खाजगी अनुदानित महाविद्यालयांमधील ५०१२ सहाय्यक प्राध्यापकांची पदे संवैधानिक आरक्षणासह संगणकीय ऑनलाइन पारदर्शी प्रणालीचा उपयोग करून भरावी अशी मागणी करण्यात आली आहे. याबाबत सविस्तर वृत्त असे की, महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र राज्यातील खाजगी अनुदानित महाविद्यालयांमधील ५०१२ सहाय्यक प्राध्यापकांची पदे आरक्षणासह पारदर्शक पद्धतीने भरण्याची जबाबदारी शासन निर्णय दिनांक ११ फेब्रुवारी, २०२६ नुसार उच्च शिक्षण संचालकांवर सोपविलेली आहे. करिता संचालकांनी ही भरती प्रक्रिया महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (अध्यापक संवर्गातील आरक्षण) अधिनियम, २०२१ व युजिसीचे दिनांक १६ फेब्रुवारी, २०२६ चे पत्र तसेच जनहित याचिका २६/२०२४ मध्ये न्यायालयाने दिलेल्या अंतिम निकालाच्या आदेशानुसार म्हणजे "यूजीसी नियमांना घट्ट चिकटून राहून आणि काटेकोर पालन करूनच' पारदर्शी, वस्तुनिष्ठ व विश्वासार्ह गुणवत्तेनुसार" करावी. याशिवाय मा. उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर व मा. सर्वोच्च न्यायालय, दिल्ली यांनी सुद्धा तसे आदेश शासनाला दिलेले आहेत. तसेच सदर भरती प्रक्रिया ही यूजीसी नोटिफिकेशन्स दिनांक ३० जून ,२०१०, दिनांक १८ जुलै, २०१८, दिनांक ३० जून, २०२३ नुसार करण्यात यावी आणि गुणवंत उमेदवारांना समान संधी व न्याय प्रदान करण्यासाठी गुजरात राज्यात आहे तशी संगणकीय ऑनलाइन पारदर्शी प्रणाली विकसित करूनच राज्यातील सर्व विद्यापीठे व महाविद्यालयातील प्राध्यापकांची भरती करावी अशी मागणी डाटाच्या वतीने दिलेल्या निवेदनात केली आहे. प्राध्यापक पदासाठी पात्र उमेदवार, विद्यार्थी व डॉ. बाबासाहेब आंबेडकर टिचर्स असोसिएशनच्या वतीने सहसंचालक व संचालक कार्यालयावर मोर्चा काढून आंदोलन केले जाईल असा इशारा निवेदनातून देण्यात आला आहे, असे डाटा चे उपाध्यक्ष डॉ.अशोक भोरजार, सचिव डॉ.एम.आर.इंगळे, सहसचिव डॉ.कल्याण साखरकर यांनी कळविले आहे.


## जाहीर नोटीस

**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय वाशिम, विभाग वाशिम.**
**(चौकशी जाहीर नोटीस)**

**फेरफार अहवाल अर्ज क्र. १५/२५ कलम ५० अ(१)**
**सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्र.:- श्री. संत सेवा संस्थान वाशिम ता. जि. वाशिम ए-९०२ (अकोला) ए-२०५ (वाशिम) बाबत**

**अर्जदार : श्री. विशाल उत्तम कोकाटे + १**

सर्व संबंधित लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्या येते की,

सहाय्यक धर्मादाय आयुक्त वाशिम विभाग वाशिम हे वर नमूद केलेल्या फेरफार अहवाल / अर्जासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० चे कलम ५० अ(१) अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत.

१) वर नमूद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरूपाचे आहे काय ? २) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ? अ) जंगममिळकत (वर्णन) परिशीप्ठ १ प्रमाणे ब) स्थावरमालमत्ता (वर्णन): परिशीष्ठ १ प्रमाणे सदर प्रकरण महा. सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० च्या कलम ५० अ(१) अन्वये न्यायिक बोर्डवर प्रलंबित आहे.

**प्रस्तावीत योजनेप्रमाणे विश्वस्त मंडळ---**

१) श्री. विशाल उत्तम कोकाटे रा. शुक्रवार पेठ वाशिम ता. जि. वाशिम
२) श्री. नामदेव बालाजी सुरेकर रा. आय. यु. डी.पी. कॉलोनी फेज १ वाशिम
३) श्री. संदीप कुंडलिक चिखलकर रा. शुक्रवार पेठ वाशिम ता. जि. वाशिम
४) श्री. श्यामभाऊ बबनराव दळवी रा. संतोषी माता नगर वाशिम ता. जि. वाशिम
१) श्री. बजरंग बबन आळणे रा. शुक्रवार पेठ वाशिम ता. जि. वाशिम
६) श्री गणेश प्रभाकर भोयाळकर रा. गुरुवार बाजार वाशिम ता. जि. वाशिम
७) श्री. राजेश नारायण बोरकर रा. गुरुवार बाजार वाशिम ता. जि. वाशिम
८) श्री. मोहन दत्तात्रय कणखर रा. चंडिकावेस वाशिम ता. जि. वाशिम
९) श्री. संतोष श्रीराम राऊत रा. शुकवार पेठ वाशिम ता. जि. वाशिम
१०) श्री. श्रीराम भगवान ढवळे रा. त्रिवेणी नगर वाशिम ता. जि. वाशिम
११) श्री. कैलाश कुंडलिक कोकाटे रा. शुक्रवार पेठ वाशिम ता. जि. वाशिम

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देनेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत हि नोटीस प्रसिध्द झाल्या तारखे पासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाने वरील पत्यावर मिळेल अश्या रीतीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच बरील मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काहीही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पूर्ण केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

शिक्का

**(आर. एन. गिऱ्हे)**
**अधीक्षक**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय**
**वाशिम विभाग वाशिम**



## नगर परिषद मंगरुळपीर, जि. वाशिम

DAY-NULM: D-JAYS
जलसंपदा विभाग

पत्ताः Email Id:-aponulm@gmail.com जा.क्र./२०२६/नप/ १२१६/२०२६ दि. ११ ऑगस्ट २०२६

### जाहीर सूचना

केंद्र शासनाद्वारे संपूर्ण देशात 'पथविक्रेता (उपजीविकेचे संरक्षण आणि पथविक्री विनियमन) अधिनियम, २०१४ लागू करण्यात आलेला आहे. सदर अधिनियमातील कलम ३६ (१) मधील तरतुदींच्या अनुषंगाने महाराष्ट्र शासनाने 'महाराष्ट्र पथविक्रेता नियम, २०१६ राजपत्रात प्रसिद्ध केले आहेत. सदर केंद्रीय अधिनियमाचे कलम २० आणि राज्य नियमावली २०१६ मधील प्रकरण २, नियम क्र. ३ व ४ नुसार, प्रत्येक स्थानिक प्राधिकरणाच्या कार्यक्षेत्रात नागरी पथविक्रेत्यांच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी व विवादांवर कायदेशीर तोडगा काढण्यासाठी एक स्वतंत्र 'तक्रार निवारण व विवाद निर्णय समिती (Grievance Redresal and Dispute Resolution Committee) घटित करणेबाबत नमूद केलेले आहे.

सदर समितीच्या स्थापनेबाबत महाराष्ट्र पथविक्रेता (उपजीविका संरक्षण व पथविक्री विनियमन) नियम, २०१६ मधील प्रकरण २. नियम क्र. ३ व ४ नुसार या समितीची रचना खालील वैधानिक निकषांनुसार असणे आवश्यक आहे. सदर समितीमध्ये एक अध्यक्ष व इतर दोन व्यावसायिक सदस्य यांची नियुक्ती असेल अशी तरतूद आहे. समितीचे अध्यक्षः दिवाणी न्यायाधीश (Civil Judge) किंवा न्यायदंडाधिकारी (Magistrate) आहेत तर समितीचे इतर दोन सदस्य म्हणून नियुक्तीसाठी खालीलप्रमाणे अर्हता व अनुभव आवयश्क आहे.

| अ.क्र. | पद नाव व सदस्य संख्या | आवश्यक अर्हता व अनुभव |
|---|---|---|
| ०१ | तक्रार निवारण व विवाद निर्णय समिती (व्यावसायिक) सदस्य- एकूण ०२ पदे | (०१) पस्तीस वर्षांहून अधिक वयाची असेल परंतु पासष्ट वर्षापेक्षा अधिक वयाची नसेल; (०२) मान्यताप्राप्त विद्यापीठाची स्नातक पदवी (Degree) सदस्य- एकूण ०२ पदे धारण करीत असेल, (०३) १: तिला स्थानिक प्राधिकरणामधील कामाचा अनुभव असेल व शासनाचा अवर सचिव किंवा तत्सम दजपिक्षा कमी दर्जा नसलेल अधिकारी म्हणून स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये तिने काम केलेले असेल, आणि (०४) कार्यकुशलता, सचोटी व प्रतिष्ठा असलेली व्यक्ती असेल आणि सामाजिक कार्यामधील अथवा पथविक्रेत्यांशी किंवा सार्वजनिक कामांशी किंवा नागरी वा सार्वजनिक प्रशासनाशी संबंधित समस्या हाताळण्याचे किमान दह वर्षांचे पर्याप्त ज्ञान वा अनुभव असलेली असेल, अशी व्यक्ती, तक्रार निवारण व विवाद निर्णय समितीमध्य सदस्य म्हणून नियुक्ती केली जाण्यास पात्र असेल. या सार्वजनिक प्रशासनाशी संबंधित समस्या हाताळण्याचे किमान दहा वर्षांचे पर्याप्त ज्ञान वा अनुभव असलेली असेल, अशी व्यक्ती, तक्रार निवारण व विवाद निर्णय समितीमध्ये सदस्य म्हणून नियुक्ती केली जाण्यास पात्र असेल. |
| ०२ | पदावधी: | सदर समितीचा कार्यकाळ नियुक्तीच्या दिनांकापासून ५ (पाच) वर्षांचा राहील. |
| ०३ | अर्ज करावयाची मुदत | पात्र आणि इच्छुक उमेदवारांनी आपले अर्ज आवश्यक कागदपत्रांसह १७ ऑगस्ट २०२६ पर्यंत सादर करणे आवश्यक आहे. |

अधिक माहितीसाठी व अर्जाच्या मसुद्यासाठी संपर्कः दी. अ. यो. राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान कक्ष, नगर परिषद वाशिम येथे कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.

दिनांक: ११/०८/२०२६

**अध्यक्ष (श्री. अनिल केंदळे) नगर परिषद वाशिम**

**उपाध्यक्ष (राजुभाऊ भादुर्गे) नगर परिषद वाशिम**

**मुख्याधिकारी (अरविंद मुंढे) नगर परिषद वाशिम**



## नगर परिषद मंगरुळपीर, जि. वाशिम

DAY-NULM: D-JAYS
जलसंपदा विभाग

पत्ताः Email Id:-nulmwashim@gmail.com जा.क्र./२०२६/नप/२६/२०२६ दि. ११ ऑगस्ट २०२६

### : जाहीर सूचना:

केंद्र शासनाद्वारे संपूर्ण देशात 'पथविक्रेता (उपजीविकेचे संरक्षण आणि पथविक्री विनियमन) अधिनियम, २०१४ लागू करण्यात आलेला आहे. सदर अधिनियमातील कलम ३६ (१) मधील तरतुदींच्या अनुषंगाने महाराष्ट्र शासनाने 'महाराष्ट्र पथविक्रेता नियम, २०१६ राजपत्रात प्रसिद्ध केले आहेत. सदर केंद्रीय अधिनियमाचे कलम २० आणि राज्य नियमावली २०१६ मधील प्रकरण २, नियम क्र. ३ व ४ नुसार, प्रत्येक स्थानिक प्राधिकरणाच्या कार्यक्षेत्रात नागरी पथविक्रेत्यांच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी व विवादांवर कायदेशीर तोडगा काढण्यासाठी एक स्वतंत्र 'तक्रार निवारण व विवाद निर्णय समिती (Grievance Redresal and Dispute Resolution Committee) घटित करणेबाबत नमूद केलेले आहे.

सदर समितीच्या स्थापनेबाबत महाराष्ट्र पथविक्रेता (उपजीविका संरक्षण व पथविक्री विनियमन) नियम, २०१६ मधील प्रकरण २. नियम क्र. ३ व ४ नुसार या समितीची रचना खालील वैधानिक निकषांनुसार असणे आवश्यक आहे. सदर समितीमध्ये एक अध्यक्ष व इतर दोन व्यावसायिक सदस्य यांची नियुक्ती असेल अशी तरतूद आहे. समितीचे अध्यक्षः दिवाणी न्यायाधीश (Civil Judge) किंवा न्यायदंडाधिकारी (Magistrate) आहेत तर समितीचे इतर दोन सदस्य म्हणून नियुक्तीसाठी खालीलप्रमाणे अर्हता व अनुभव आवयश्क आहे.

| अ.क्र. | पद नाव व सदस्य संख्या | आवश्यक अर्हता व अनुभव |
|---|---|---|
| ०१ | तक्रार निवारण व विवाद निर्णय समिती (व्यावसायिक) सदस्य- एकूण ०२ पदे | (०१) पस्तीस वर्षांहून अधिक वयाची असेल परंतु पासष्ट वर्षापेक्षा अधिक वयाची नसेल; (०२) मान्यताप्राप्त विद्यापीठाची स्नातक पदवी (Degree) धारण करीत असेल, (०३) १: तिला स्थानिक प्राधिकरणामधील कामाचा अनुभव असेल व शासनाचा अवर सचिव किंवा तत्सम दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेल अधिकारी म्हणून स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये तिने काम केलेले असेल, आणि (०४) कार्यकुशलता, सचोटी व प्रतिष्ठा असलेली व्यक्ती असेल आणि सामाजिक कार्यामधील अथवा पथविक्रेत्यांशी किंवा सार्वजनिक कामांशी किंवा नागरी वा सार्वजनिक प्रशासनाशी संबंधित समस्या हाताळण्याचे किमान दह वर्षांचे पर्याप्त ज्ञान वा अनुभव असलेली असेल, अशी व्यक्ती, तक्रार निवारण व विवाद निर्णय समितीमध्य सदस्य म्हणून नियुक्ती केली जाण्यास पात्र असेल. या सार्वजनिक प्रशासनाशी संबंधित समस्या हाताळण्याचे किमान दहा वर्षांचे पर्याप्त ज्ञान वा अनुभव असलेली असेल, अशी व्यक्ती, तक्रार निवारण व विवाद निर्णय समितीमध्ये सदस्य म्हणून नियुक्ती केली जाण्यास पात्र असेल. |
| ०२ | पदावधी: | सदर समितीचा कार्यकाळ नियुक्तीच्या दिनांकापासून ५ (पाच) वर्षांचा राहील. |
| ०३ | अर्ज करावयाची मुदत | पात्र आणि इच्छुक उमेदवारांनी आपले अर्ज आवश्यक कागदपत्रांसह १७ ऑगस्ट २०२६ पर्यंत सादर करणे आवश्यक आहे. |

अधिक माहितीसाठी व अर्जाच्या मसुद्यासाठी संपर्कः दी. अ. यो. राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान कक्ष, नगर परिषद वाशिम येथे कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.

दिनांक: ११/०८/२०२६

**अध्यक्ष (श्री. अशोक परळीकर) नगर परिषद, मंगरूळपीर**

**उपाध्यक्ष (अनिल गावंडे) नगर परिषद, मंगरूळपीर**

**मुख्याधिकारी (अरविंद मुंढे) नगर परिषद, मंगरूळपीर**

सिटी न्यूज अकोला

३

मंगळवार, दि. ११ ऑगस्ट २०२६ Web. http://epaper.citynewssuperfast.com

# महान येथे पोलिसांना मारहाण करणाऱ्या 20 आरोपींना अटक

## 26 जणांवर गुन्हे दाखल

प्रतिनिधी ११ ऑगस्ट

**बार्शीटाकळी:** पिंजर पोलीस स्टेशन अंतर्गत महान गावात जागतिक आदिवासी दिन मिरवणुकी दरम्यान 9 ऑगस्टला पोलिसांना मारहाण करण्याची घटना झाली होती. या घटनेत 26 आरोपीवर गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल झाले आहेत. यापैकी 20 जणांना पोलीसांनी अटक केली असून न्यायालयाने आरोपींना तीन दिवसाची पोलीस कस्टडी दिली असून घटनेतील आरोपींचा पोलीस शोध घेण्याचा प्रयत्न करीत आहेत.

9 ऑगस्ट रोजी महान येथे वस्तापूर, झोडगा फाट्याकडून राष्ट्रीय महामार्गावरून मिरवणूक येत असताना, महानच्या स्टेट बँके समोर दुपारी तीन वाजताचे सुमारास मिरवणुकीतील व्यक्ती व पोलिसांच्या वादामध्ये पिंजर पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक अभिषेक नवघरे व पोलीस कर्मचारी यांना मारहाण करण्याची घटना घडली होती. या घटने संदर्भात पिंजर पोलिसात पोलीस शिपाई राजेश सावळे यांनी फिर्याद दाखल केली होती.

पिंजर पोलिसांनी गुन्हे दाखल केले. यामधील आरोपी अविनाश अंबादास पंधरे वाल्पी, संतोष पांडुरंग सुरळकर रा. हातोला, नारायण लोखंडे कोथळी, सागर नंदकिशोर पंधरे रा. वाल्पी, अशोक समाधान शिरसाम रा. वाल्पी, निलेश निळकंठ उइके रा. साल्पी, मदन अरुण कोकाटे रा. साल्पी, गोपाल गणेश कांबळे रा. वाल्पी,, किसन श्रीराम गोदमले रा. वस्तापूर, प्रशांत किसन उईके रा. वाल्पी, सचिन प्रल्हाद वाघमारे रा. वस्तापूर, आशिष बंडू सयाम रा. साल्पी, महादेव यशवंत डाखोरे रा. वस्तापूर, विशाल रामदास शेंडे रा. वस्तापूर, आकाश महादेव डाखोरे रा. वस्तापूर, कैलाष विठ्ठल झळके रा. वस्तापूर, अर्जुन बबन टाले रा. वस्तापूर, बालाबाई महादेव डाखोरे रा. वस्तापूर, पंचफुला रामदास शेंडे रा. वस्तापूर, सीताबाई सुदाम ठोंबरे वस्तापूर, गोपाल वाघमारे वस्तापूर, दत्ता वाघमारे वस्तापूर, विकास दत्ता वाघमारे वस्तापूर, गणेश गोपाल वाघमारे वस्तापूर,, गुलाब पावले वस्तापूर, दिनेश लोखंडे टिटवा तसेच इतर अनोळखी आरोपींवर गुन्हे दाखल केले आहेत.

अटक करण्यात आलेल्या आरोपींना पिंजर पोलिसांनी 10 ऑगस्टला न्यायालयात उपस्थित केले होते. न्यायालयाचे प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी मोहन कुरे यांनी आरोपींना 13 ऑगस्टपर्यंत तीन दिवसाची पोलीस कस्टडी दिल्याची माहिती सूत्रांनी दिली. घटनेचा तपास पिंजर पोलीचे पोलीस निरीक्षक गजानन राठोड करीत आहेत.




### आदिवासी दिनाच्या रॅलीत पोलिसांवर हल्ल्याचा आरोप; मुस्लिम कुटुंबाने दिला पोलिसांना आसरा



**बार्शीटाकळी:** तालुक्यातील महान गावात आदिवासी दिनानिमित्त रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. रॅलीदरम्यान काही आदिवासी बांधवांकडून पोलिसांवर हल्ला करण्यात आल्याचा आरोप असून, या घटनेत पोलिस उपनिरीक्षक नवघरे यांच्यावरही हल्ल्याचा प्रयत्न झाल्याची माहिती समोर आली आहे.(हल्ल्याच्या परिस्थितीत पोलिस उपनिरीक्षक नवघरे यांनी सुरक्षित ठिकाण मिळवण्यासाठी एका मुस्लिम कुटुंबाच्या घरात आसरा घेतला. संबंधित कुटुंबाने पोलिस अधिकाऱ्याला घरात सुरक्षित जागा देऊन सहकार्य केल्याने त्यांचा जीव वाचल्याचे सांगण्यात येत आहे.

घटनेनंतर वरिष्ठ पोलिस अधिकारी रेड्डी तसेच पोलिस ठाणेदार राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील कारवाई सुरू असल्याचे समजते. या घटनेमुळे महान परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. पोलिस प्रशासनाकडून घटनेची चौकशी करून दोषींवर कायदेशीर कारवाई करण्यात येत असल्याची माहिती आहे. महान गावातील या घटनेत संकटाच्या वेळी मुस्लिम कुटुंबाने पोलिसांना दिलेला आसरा हा मानवता आणि सामाजिक ऐक्याचे उदाहरण ठरल्याची चर्चा परिसरात होत आहे.

# सोयाबिन उत्पादक शेतकऱ्यांची कार्यशाळा उत्साहात संपन्न



प्रतिनिधी १ १ऑगस्ट

**अडगाव बु. :** खरीप हंगामातील महत्त्वाचं पीक म्हणून शेतकरी सोयाबीन ला महत्त्व देतात त्यामुळे त्यांनी जमिनीची पोतकायम ठेवत जास्तीत जास्त उत्पन्न कसे काढायचे याबाबत कार्ड संस्थेच्या वतीने सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांची संवाद सभेच्या माध्यमातून आयोजित कार्यशाळा उत्साहात झाली.

येथील सावकार पेठेतील अजिंक्य टेरेस वर सोसायटी अध्यक्ष मनोहरलाल फाफट यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यशाळेला कार्ड संस्थेचे अध्यक्ष विजयकुमार लाडोळे, व्यवस्थापक लक्षदिप बोडखे, क्षेत्र प्रवर्तक ज्ञानेश्वर वाळके, आकाश दाभाडे,गौरव गुजर, तालुका उपकृषी अधिकारी राजनकर, सहायक कृषी अधिकारी विठ्ठल बिहाडे, गटनेते संजय राजनकर यांची प्रमुख उपस्थिती होती.. कम्युनिटी ॲक्शन फॉर डेव्हलपमेंट सोसायटी अंजनगाव सुर्जी (कार्ड) या संस्थेने दत्तक घेतलेल्या अडगाव बु,अडगाव खुर्द,मालठाणा व सदरपुर येथील बहुसंख्येने सोयाबीन उत्पादक शेतकरी या कार्यशाळेत सहभागी झाले होते सुरुवातीला अडगाव बु क्षेत्र प्रवर्तक ज्योती विजय खिरोडकार यांनी प्रास्ताविकातून संस्थेची भुमिका विशद करून संस्था सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांकरीता करीत असलेल्या कामाबाबत माहिती दिली.

सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांनी उत्पादनात वाढ करण्यासोबतच जमिनीची सुपीकता व उत्पादन क्षमता वाढविण्याकडे लक्ष दिले पाहिजे यात दिर्घकाळ टिकणारी शेती, वातावरणानुसार शेतीमध्ये बदल करणे, जमिनीचे पोषण मुल्य कायम ठेवणे, पिकांची रोग क्षमता वाढविणे तसेच जैविक खतांचे प्रयोजन करणे या बाबी कशा आवश्यक आहेत याबाबत कार्ड संस्था करीत असलेल्या कार्याबद्दल संस्थाध्यक्ष विजयकुमार लाडोळे यांनी उपस्थित शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले याप्रसंगी कृषी अधिकारी राजनकर,बिहाडे व्यवस्थापक बोडखे,क्षेत्र प्रवर्तक दाभाडे यांनी आपले मनोगत व्यक्त केले सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांनी जमिनीची सुपीकता कायम ठेवत आपले उत्पादन वाढविण्यासाठी लक्ष द्यावे असे आवाहन अध्यक्षीय भाषणातून मन्नूभाऊ फाफट यांनी केले चर्चा सत्रात सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांनी आपल्या शंकांचे समाधान केले कार्यक्रमाचे संचालन माजी सरपंच अशोक घाटे यांनी तर आभार प्रदर्शन क्षेत्र प्रवर्तक ज्योती खिरोडकार यांनी केले कार्यशाळेच्या यशस्वीतेसाठी कार्ड संस्थेच्या सभासदांनी अथक परिश्रम घेतले.

# आदर्श महाविद्यालयात 'नशामुक्त भारत अभियान'चा जागर

## अकोला पोलीस दल, जिल्हा शल्यचिकित्सक कार्यालय, मेरा युवा भारत केंद्र, आदर्श महाविद्यालय व गाडगेबाबा सामाजिक प्रतिष्ठानचा संयुक्त उपक्रम

प्रतिनिधी ११ऑगस्ट

**अकोला :** अकोला पोलीस दलाच्या मिशन उड्डाण, आदर्श कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालय, अकोला आणि गाडगेबाबा सामाजिक प्रतिष्ठान, अकोला यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयात 'नशामुक्त भारत अभियान' उत्साहात राबविण्यात आले. विद्यार्थी विकास विभाग व राष्ट्रीय सेवा योजना यांच्या पुढाकाराने आयोजित या अभियानातून विद्यार्थ्यांमध्ये व्यसनमुक्त जीवनशैली, तंबाखूमुक्त परिसर आणि नशामुक्त समाजाचा संदेश देण्यात आला.




कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आदर्श महाविद्यालयाच्या प्राचार्य प्रा. डॉ. रक्षा डवरे होत्या. प्रमुख मार्गदर्शक म्हणून मा. डॉ.धम्मसेन शिरसाठ, समुपदेशक, राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रम, जिल्हा शल्यचिकित्सक कार्यालय, अकोला यांनी तंबाखूमुक्त परिसर या विषयावर मार्गदर्शन केले. त्यांनी तंबाखू व विविध व्यसनांचे शारीरिक, मानसिक तसेच सामाजिक दुष्परिणाम स्पष्ट करून विद्यार्थ्यांनी व्यसनांपासून दूर राहण्याचे आवाहन केले.

अभियानांतर्गत नशामुक्त भारत अभियानाचे उद्घाटन, व्यसनमुक्ती पथनाट्य, पोस्टर, घोषवाक्य, चित्रकला व निबंध स्पर्धा, 'Say No to Drugs' जनजागृती रॅली, मानवी साखळी, स्वाक्षरी अभियान, व्यसनमुक्ती शपथ तसेच व्यसनमुक्तीविषयक माहितीपत्रके व हेल्पलाइन माहितीचे वितरण अशा विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. 'मी नशामुक्त भारताचा जबाबदार नागरिक' या संदेशासह विद्यार्थ्यांनी स्वाक्षरी अभियान उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. पोलीस-विद्यार्थी संवादातूनही व्यसनमुक्तीबाबत जनजागृती करण्यात आली.

यावेळी युवा कार्यक्रम व क्रीडा मंत्रालय, भारत सरकारच्या 'मेरा युवा भारत' केंद्र, अकोला यांच्या वतीने आयोजित जिल्हास्तरीय विविध स्पर्धांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थिनींचा गौरव करण्यात आला.कु. पूनम पैठणे हिने रील स्पर्धेत द्वितीय क्रमांक,तर कु. नारायणी शास्त्री हिने वक्तृत्व स्पर्धेत तृतीय क्रमांक प्राप्त केल्याबद्दल त्यांना स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

# माजी क्रीडा राज्यमंत्री गुलाबराव गावंडे यांच्या चांगल्या प्रकृतीसाठी लक्षेक्ष्वराला प्रार्थना

प्रतिनिधी १ १ऑगस्ट

**मूर्तिजापूर :** माजी क्रीडामंत्री, विदर्भ कबड्डी असोसिएशनचे माजी अध्यक्ष गुलाबराव गावंडे यांची तब्येत लवकर चांगली व्हावी यासाठी तालुका क्रीडा परिवार तर्फे तीर्थक्षेत्र लाखपुरी येथे भगवान श्री लक्षेक्ष्वराला सोमवारी अभिषेक व महाआरती करण्यात आली.

अनेक खेळाडू तयार करून त्यांना शासकीय नोकरीपर्यंत पोहोचवणे, गोरगरीब मुला-मुलींचे विवाह लावून देणारे लोकनेते गुलाबराव भाऊ गावंडे यांची तब्येत लवकर चांगली व्हावी असे मनोगत आमदार हरीश पिंपळे यांनी व्यक्त केले . यावेळी माजी क्रीडा अधिकारी विजय खोकले , विदर्भ कबड्डी असो. सहसचिव डॉ. विशाल येदवर , जिम संघटक पप्पू पाटील तिडके ,जेष्ठ खेळाडू गजाननराव महल्ले , मोती पाटील भटकर , शेखर यदवर, ग्रा. पं. प्रशासक राजू कैथवास, दिलीप गोसावी, पुरषोत्तम डागा , संजय खंडारे,सतिषसिह चौहान,अनिल ठोकळ, सुभाष जोगी, संदीप गावंडे, बाळासाहेब खांडेकर, राजु इंगोले, दिवाकर काटे, प्रेम कैथवास, राहुल कडू, कैलास तामसे, प्रणव फुलझेले , प्रमोद अवघड , स्वप्नील जामनिक, दिलीप सुरदुसे, जयंत काटोलकर , महादेव सुरदुसे, कुलदीप सदार,रविन्द्र दहापुते, रामभाऊ तामसे सुधाकर सतराटे, वसंत तामसे, अंबादास कुकडे यांची उपस्थिती होती.



लक्षेक्ष्वर मंडळाचे दत्ता गव्हाळे , राकेश पुरोहित, अक्षय अवघड, धनराज सुरदुसे, सचिन तामसे , पिट्टू कैथवास, सोमेश दहापुते, गौरव तामसे,पवन व्यास, राम तामसे, शिवम मेहर , मयूर जोगी,जगन सुरदुसे,सौरभ हरणे, अनिल जोगी, सिद्धेश शर्मा, दत्ता जोगी इत्यादी सेवाधारी यांनी प्रार्थना कार्यक्रमाचे नियोजन केले अशी माहिती क्रीडा संघटक राजू दहापुते यांनी दिली.

# कष्टकऱ्यांच्या अश्रूला साहित्याचे रूप देणारे अण्णाभाऊ साठे : प्रा. माहुरे

प्रतिनिधी ११ऑगस्ट

**अकोला:** फुले-आंबेडकर विद्वत सभा जिल्हा शाखेच्या वतीने लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त प्रा. राहुल माहुरे यांचे 'अण्णाभाऊ साठे जीवन चरित्र व आंबेडकरी चळवळीतील योगदान' या विषयावर रविवारीअशोक वाटिका सभागृहात व्याख्यान झाले. कष्टकऱ्यांच्या अश्रूंना साहित्याचे रूप देणारे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे होते अशा शब्दांत प्रा. माहुरे यांनी त्यांचा गौरव केला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा समन्वयक, फुले-आंबेडकर विद्वत सभा.डॉ. संजय पोहरे होते. प्रमुख मार्गदर्शक म्हणून श्री पुंडलीक महाराज महाविद्यालय, नांदुरा येथील वाणिज्य विभाग प्रमुख प्रा.राहुल माहुरे होते. प्रमुख उपस्थिती म्हणून विभागीय समन्वयक, फुले-आंबेडकर विद्वत सभा सिध्दार्थ देवदरीकर,डॉ. संदीप डोंगरे, ॲड. मुरलीधर इंगळे विचार मंचावर उपस्थित होते. सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते महामानवांच्या प्रतिमेचे पूजन व हारार्पन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सिध्दार्थ देवदरीकर यांनी केले. ॲड. मुरलीधर इंगळे यांचे भाषण झाले. अण्णाभाऊंनी 'फकिरा' कादंबरी विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अर्पण केली हे त्यांच्या आंबेडकरवादाभिमुखतेचे द्योतक आहे. 'पृथ्वी शेषनागाच्या मस्तकावर नव्हे, तर कष्टकऱ्यांच्या हातावर आहे' या त्यांच्या वक्तव्यामुळे जातीय व वर्गीय शोषणाविरुद्धची भूमिका अधोरेखित असे प्रा. राहुल माहुरे म्हणाले. डॉ. संजय पोहरे यांनी अण्णाभाऊंच्या साहित्यात मार्क्सवाद व आंबेडकरवाद यांचा समन्वय दिसून येतो असे सांगितले. कार्यक्रमाचे संचालन दादा गवई यांनी तर आभार प्रदर्शन भाऊराव सोनोने यांनी केले.

# शासकीय आयटीआय मध्ये आर्किटेक्चर ड्राफ्ट्समन व्यवसायाला नव्याने मान्यता

प्रतिनिधी ११ऑगस्ट

**अकोला :-** स्थानिक रतनलाल प्लॉट स्थित सम्राट चंद्रगुप्त मौर्य शासकीयऔद्योगिक प्रशिक्षण संस्था येथे ड्राफ्ट्समन मेकॅनिक या व्यवसायाला आणखी २४ जागांची उपलब्धता झालेली आहे. खूप मागणीच्या असलेल्या या व्यवसायाला दिनांक १२ ऑगस्ट रोजीच्या पहिल्या समुपदेशन




फेरीमध्ये इच्छुक उमेदवारांनी प्राधान्याने प्रवेश घ्यावा असे आवाहन संस्थेचे प्राचार्य तथा जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी संतोष साळुंके यांनी केले आहे. संस्थेचे प्रवेश प्रमुख विनोद पायघन यांनी दिलेल्या माहितीनुसार समुपदेशनाची पहिली फेरी ही १२ ऑगस्ट रोजी सकाळी आठ वाजता पासून सुरू होणार आहे. या समुपदेशन फेरीमध्ये जर पूर्ण प्रवेश न झाल्यास आणखी पुढे समुपदेशन फेऱ्या ह्या होणार आहेत.तरी त्याकरता फेरीच्या आधी ऑनलाईन हजेरी दाखल करून समुपदेशन फेरीला हजर रहावे अशी माहिती दिली. पुढील फेरी करिता रिक्त जागा आणि समुपदेशन फेरी याबद्दलच्या अधिक माहिती करता संस्थेशी संपर्क साधावा किंवा admission.dvet.gov.in संकेतस्थळाला भेट द्यावी असे संस्थेचे प्रसिद्धी प्रमुख अरविंद पोहरकर यांनी सांगितले.

# माँ गायत्री प्राथमिक मराठी शाळा व स्व. प्रकाश देशमुख विद्यालयात नशामुक्ती महा अभियान

प्रतिनिधी १ १ऑगस्ट

**अकोला :** माँ गायत्री प्राथमिक मराठी शाळा व स्व. प्रकाश देशमुख विद्यालयात प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय मार्फत नशा मुक्ती प्रतिज्ञा कार्यक्रम आज १० ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता घेण्यात आला. विद्यार्थ्यांना मान्यवरांनी नशामुक्ती विषयावर मार्गदर्शन केले.




या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अर्चना दीदी होत्या. आणि प्रमुख अतिथी सुनिता शर्मा, डॉ.संजीवनी जवादे व श्री.सिध्देश्वर देशमुख उपस्थित होते. अर्चना दीदी यांनी विद्यार्थ्यांना नशामुक्ती विषयावर मार्गदर्शन केले. तसेच श्री. सिद्धेश्वर देशमुख यांनी सुद्धा विद्यार्थांना मोलाचे मार्गदर्शन केले. शाळेचे मुख्याध्यापक संदीप वाघ, सुनिल चव्हाण, शिक्षक रामेश्वर बुंदेले, वर्षा हिवराळे, चंदा रोकडे, मिना काटे, वैशाली इंगळे, कल्पना सोळंके, कीर्ती पोके, आरती देशमुख, पुजा बुंदेले, शिक्षकेतर कर्मचारी चंद्रजीत देशमुख, योगेश लंगोटी, रणजीत ठाकूर उपस्थित होते.

# लिनेस क्लब ऑफ अकोलाच्या मासिक सभेत माजी अध्यक्षांचा गौरव

## पर्यावरण संवर्धन पोस्टर स्पर्धेचेही आयोजन, विविध कार्यक्रमांचे आयोजन

प्रतिनिधी ११ ऑगस्ट

**अकोला:** लिनेस क्लब ऑफ अकोलाची मासिक सभा लि. प्रियंका पडगीलवार यांच्या मराठा नगर येथील 'यश निवास' या ठिकाणी उत्साहात पार पडली. क्लबच्या माजी अध्यक्षांचा यथोचित सन्मान करणे हा या विशेष बैठकीचा मुख्य उद्देश होता. ज्या माजी अध्यक्षांनी आपल्या कार्यकाळात अमूल्य वेळ, कार्यनिष्ठा, नवनवीन उपक्रम आणि सामाजिक बांधिलकी जपत लिनेस क्लबची प्रगती साधली, त्यांचा या वेळी विशेष गौरव करण्यात आला.



या सभेच्या आयोजनाची जबाबदारी लि. प्रियंका पडगीलवार, लि. प्रीती कमावीजदार, लि. वीना वोरा, लि. मोना पारेख व लि. मौसमी ठाकुर यांनी उत्कृष्टपणे सांभाळली. कार्यक्रमाची सुरुवात स्वागत, प्रार्थना आणि राष्ट्रगीताने झाली. लि. गीता रूपारेलिया यांनी आपल्या मधुर आवाजात प्रार्थना व राष्ट्रगीत सादर केले. क्लबच्या अध्यक्षा लि. राजश्री समनपुरे यांच्या अध्यक्षीय भाषणानंतर लिनेस क्लबच्या सचिवा लि. वनीता बिजवे यांनी सचिव अहवाल सादर केला. 'रिमझिम पावसाच्या सरींनी सृष्टी हिरवीगार झाली आहे, आणि आज तुम्ही सर्व आमच्या सत्कारमूर्ती आहात...' या भावनेतून क्लब अध्यक्षा राजश्री समनपुरे यांच्या हस्ते सर्व सन्माननीय माजी अध्यक्षांना शाल, पुष्पगुच्छ आणि रोपटे देऊन सन्मानित करण्यात आले. सभेत पी.डी.पी. लि. हरविंदर कौर सेठी, पी.डी.पी. लि. ऊषाजी बाहेती, पी.डी.पी. लि. आशाजी विरवानी, पी.डी.पी. लि. सुनंदाजी गुप्ता, पी.डी.पी. लि. स्वातीजी झुनझुनवाला, डिस्ट्रीक्ट प्रेसिडेंट लि. कल्पनाजी देशमुख, पूर्व अध्यक्ष लि. इंद्राणीजी देशमुख, लि. उषाजी भादू, लि. अर्चनाजी पातुरकर, लि. चंदा दीदी जायसवाल, लि. प्रियंकाजी पडगीलवार, लि. रत्नमालाजी रूईकर, लि. इंदू तिवारीजी, लि. शोभाजी राठी, लि. राजेश्रीजी देशमुख, लि. अनिताजी उपाध्याय, लि. दिनाजी शाह, लि. मंजूषाताई देशमुख, लि. ममताजी सूर्या, लि. सुलेखाजी गुप्ता आणि लि. अनीषाजी वखारिया यांचा क्रमानुसार सत्कार करून आभार व्यक्त करण्यात आले.

या वेळी सर्व सत्कारमूर्तींनी आपापले अनुभव व विचार थोडक्यात मांडून उपस्थित सदस्यांशी संवाद साधला. यासोबतच आयोजित करण्यात आलेल्या 'पर्यावरण संवर्धन पोस्टर स्पर्धेत' सुलेखाजी गुप्ता यांनी प्रथम तर उमाजी बजुरिया यांनी द्वितीय क्रमांक पटकावला. संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन लि. प्रीती कमावीजदार व लि. वनीता बिजवे यांनी बहारदार पद्धतीने केले.

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ

मंगळवार, दि. ११ ऑगस्ट २०२६

https://epaper.citynewssuperfast.com


# आई-मुलाकडून वडिलांची हत्या ?

प्रतिनिधी ११ ऑगस्ट

## मोहदा येथील धक्कादायक घटना; पायरीवरून पडल्याचा केला बनाव



**यवतमाळ** : घरगुती वादातून आई आणि मुलाने मिळून वडिलांवर हल्ला केल्याने त्यांचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना मोहदा येथे सोमवारी रात्री उघडकीस आली.

गजानन गुलाबराव जुमनाके (६०) असे मृत व्यक्तीचे नाव आहे. ते मोहदा बसस्थानक परिसरात सायकल दुरुस्तीचा व्यवसाय करीत होते. याप्रकरणी त्यांचा मुलगा अक्षय गजानन जुमनाके (३०) आणि पत्नी दुर्गा गजानन जुमनाके (५०) यांच्याविरुद्ध पोलिसांनी तपास सुरू केला आहे.

रविवारी सायंकाळी गजानन आणि त्यांची पत्नी दुर्गा यांच्यात घरगुती कारणावरून वाद झाला होता. रात्री सुमारे दहाच्या सुमारास अक्षय घरी आल्यानंतर दुर्गा यांनी त्याला सायंकाळच्या वादाची माहिती दिली. त्यानंतर पुन्हा वाद वाढला. यावेळी अक्षयने वडिलांच्या डोक्यावर लाकडी दांडक्याने प्रहार केल्याचा आरोप आहे. त्यानंतर दुर्गा यांनीही गजानन यांना मारहाण केल्याचे पोलिसांच्या प्राथमिक तपासात समोर आल्याची माहिती आहे.

डोक्याला गंभीर दुखापत झाल्याने गजानन रक्ताच्या थारोळ्यात पडले. घटनेनंतर अक्षयने वडील पायरीवरून पडल्याचा बनाव करून नातेवाईक आणि पोलिसांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केल्याचा संशय आहे. गंभीर अवस्थेत गजानन यांना यवतमाळ येथील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले.

प्रकृती चिंताजनक असल्याने डॉक्टरांनी त्यांना पुढील उपचारासाठी नागपूर येथे हलविण्याचा सल्ला दिला. नागपूर येथील रुग्णालयात उपचार सुरू असताना सोमवारी दुपारी त्यांचा मृत्यू झाला.

**नातेवाईकाच्या संशयाने प्रकरणाला कलाटणी** : गजानन यांच्या मृत्यूची माहिती त्यांच्या भावाला मिळाल्यानंतर त्यांना घटनेबाबत संशय आला. त्यांनी तत्काळ पोलिसांना माहिती दिली. त्यानंतर पांढरकवडा पोलिसांचे पथक मोहदा येथे दाखल झाले. घटनास्थळाची पाहणी करून पोलिसांनी तपासाला सुरुवात केली.

उपविभागीय पोलीस अधिकारी रॉबिन बन्सल, पांढरकवडा पोलीस ठाण्याचे ठाणेदार लहुजी तावरे, सहायक पोलीस निरीक्षक पेंढारकर, जमादार दराडे तसेच न्यायवैद्यक पथकाने घटनास्थळाची पाहणी केली. न्यायवैद्यक पथकाने रात्री उशिरापर्यंत घटनास्थळावरून पुरावे संकलित केले. प्रकरणाचा पुढील तपास पांढरकवडा पोलीस करीत आहेत.

# महिलेची हत्या; नाल्याच्या काठावर नग्नावस्थेत आढळला मृतदेह

प्रतिनिधी ११ ऑगस्ट

## गळा कापून डोक्यावर वार केल्याचा प्राथमिक अंदाज





**यवतमाळ** : पुसद तालुक्यातील सांडवा-मांडवा शिवारातील जंगल परिसरात नाल्याच्या काठावर सोमवारी (१० ऑगस्ट) एका महिलेचा नग्नावस्थेतील मृतदेह आढळल्याने खळबळ उडाली. सुरुवातीला महिलेची ओळख पटलेली नव्हती. पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवत मृत महिलेची ओळख पटविली. अलका सुखदेव सोयाम (रा. वसंतनगर, पुसद) असे तिचे नाव असल्याचे समोर आले आहे. प्राथमिक तपासात महिलेची गळा कापून तसेच डोक्यावर वार करून हत्या करण्यात आल्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे.

सांडवा-मांडवा शिवारातील जंगल भागात नाल्याच्या काठावर सकाळच्या सुमारास महिलेचा मृतदेह आढळून आला. घटनेची माहिती मिळताच पुसद ग्रामीण पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. मृतदेहाची पाहणी करून पंचनामा आणि तपासाची कार्यवाही सुरू करण्यात आली. मृत महिलेचे वय अंदाजे ३५ ते ४५ वर्षे असावे, असा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात आला होता.

महिलेची ओळख पटविणे हे पोलिसांसमोर मोठे आव्हान होते. सांडवा-मांडवा येथील पोलीस पाटील तसेच स्थानिक नागरिकांच्या मदतीने महिलेची ओळख पटविण्याचा प्रयत्न करण्यात आला. तपासादरम्यान सदर महिला वसंतनगर येथील ईदगाहच्या मागील भागात राहत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानंतर पोलिसांनी तेथे चौकशी केली असता मृत महिला अलका सुखदेव सोयाम असल्याचे स्पष्ट झाले.

पोलिसांच्या प्राथमिक माहितीनुसार, अलका सोयाम या वसंतनगर परिसरात एकट्या राहत होत्या. मृतदेहाची पाहणी केली असता डोक्यावर गंभीर दुखापतीच्या खुणा आढळून आल्या. त्यानंतरच्या तपासात महिलेची गळा कापून आणि डोक्यावर वार करून हत्या करण्यात आल्याचा प्राथमिक अंदाज समोर आला आहे.

दरम्यान, महिलेचा मृतदेह निर्जन जंगल परिसरातील नाल्याच्या काठावर नेमका कसा पोहोचला, तिची हत्या कोणी आणि कोणत्या कारणातून केली, याबाबत अद्याप स्पष्टता आलेली नाही. घटनास्थळ आणि मृत महिलेच्या पार्श्वभूमीचा विविध अंगांनी तपास केला जात आहे.

या प्रकरणी पुसद ग्रामीण पोलीस ठाण्यात अज्ञात व्यक्तीविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती आहे. पोलिसांच्या विविध पथकांकडून तपास सुरू असून, हत्येचा छडा लावण्यासाठी स्थानिक पातळीवरही माहिती संकलित केली जात आहे. शवविच्छेदन अहवालानंतर मृत्यूचे नेमके कारण आणि घटनेचे स्वरूप अधिक स्पष्ट होण्याची शक्यता आहे.

# शिकारीला गेलेल्या गोपालच्या मृत्यूचे गूढ कायम : बाराव्या दिवशी सापडले कपडे अन् मानवी अवशेष

प्रतिनिधी ११ ऑगस्ट

योगेश मडावी

## वन्यप्राण्याचा हल्ला की घातपात?

**झरी-जामणी** : झरी-जामणी तालुक्यातील मारोती पोड परिसरातील चिखलडोह शेतशिवारालगतच्या जंगलात शिकारीसाठी गेलेल्या गोपाल राजू घसाडकर ऊर्फ कृष्णा (वय अंदाजे ३०) यांच्या संशयास्पद मृत्यूचे गूढ अद्याप कायम आहे. बेपत्ता झाल्यानंतर तब्बल बाराव्या दिवशी त्यांचे कपडे आणि काही मानवी अवशेष आढळून आल्याने हा मृत्यू वन्यप्राण्याच्या हल्ल्यात झाला की अन्य कारणाने, याबाबत प्रश्न उपस्थित झाले आहेत. पाटण पोलिसांकडून या प्रकरणाचा तपास सुरू आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, २८ जुलै रोजी रात्री राजू फुलाजी आत्राम हे गोपाल यांच्या घरी शिकारीसाठी जाण्याच्या उद्देशाने आले होते. त्या वेळी गोपाल हे मद्यप्राशन केलेल्या अवस्थेत असल्याचे त्यांच्या पत्नी संगीता यांनी सांगितले. त्यामुळे त्यांना शिकारीला घेऊन जाऊ नये, अशी विनंती त्यांनी केली होती. मात्र, त्यांना सोबत नेण्यात आल्याचे कुटुंबीयांचे म्हणणे आहे. यानंतर गोपाल हे राजू फुलाजी आत्राम (वय अंदाजे ३४), सुनील चप्पत टेकाम (वय अंदाजे २२) आणि लेतू सीताराम टेकाम (वय अंदाजे ४२) यांच्यासोबत चिखलडोह शेतशिवारालगतच्या जंगलात शिकारीसाठी गेल्याची माहिती आहे.

मात्र, २९ जुलै रोजी सकाळी गोपाल घरी परतले नाहीत. पत्नीने त्यांच्यासोबत गेलेल्या व्यक्तींकडे चौकशी केली. सुरुवातीला गोपाल आपल्यासोबत आले नसल्याचे किंवा ते अन्यत्र निघून गेल्याचे सांगण्यात आल्याची माहिती कुटुंबीयांनी दिली.

**बाराव्या दिवशी कपडे अन् मानवी अवशेष** : पोलिसांच्या उपस्थितीत शोधमोहीम सुरू असताना चिखलडोह शेतशिवारालगतच्या जंगलात एका ठिकाणी गोपाल यांचा टी-शर्ट आणि पॅन्ट आढळून आले. त्याच परिसरात पायांची हाडे आणि जबड्याचा भाग आढळल्याचे सांगण्यात आले. कपडे आणि मानवी अवशेष आढळल्यानंतर पोलिसांनी गोपाल यांच्या नातेवाइकांना घटनास्थळी बोलावले. आढळलेले कपडे गोपाल यांचे असल्याची ओळख त्यांच्या पत्नी संगीता यांनी पटविल्याची माहिती आहे. घटनेनंतर तब्बल ११ ते १२ दिवसांनी कपडे आणि मानवी अवशेष सापडल्याने प्रकरणाचे गांभीर्य वाढले आहे.

### वन्यप्राण्याचा हल्ला की अन्य कारण?

■ जंगल परिसरात मानवी अवशेष आढळल्याने वन्यप्राण्याच्या हल्ल्याची शक्यता तपासणे आवश्यक आहे. त्याचबरोबर घटनाक्रमातील काही बाबींमुळे अन्य शक्यताही तपासातून पडताळून पाहण्याची गरज आहे. मात्र, फॉरेन्सिक तपासणी, वैद्यकीय अहवाल, घटनास्थळावरील पुरावे आणि पोलिस तपास पूर्ण होईपर्यंत मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होणार नाही. गोपाल राजू घसाडकर ऊर्फ कृष्णा यांच्या मृत्यूमागचे गूढ आता पोलिस तपास आणि फॉरेन्सिक अहवालातूनच उलगडणार आहे.

### घटनास्थळी फॉरेन्सिक पथक

■ घटनास्थळी पोलिस उपविभागीय अधिकारी रॉबिन बन्सल, वनरक्षक जीवन येडमे, फॉरेन्सिक पथक तसेच संबंधित अधिकारी दाखल झाले. पोलिस उपनिरीक्षक नागोराव जाधव, बीट जमादार सुगध दिवेकर, प्रशांत तलांडे, सदाशिव मातंगकर यांच्यासह पोलिस पथकाने घटनास्थळाची पाहणी करून आवश्यक पुरावे संकलित केले. गोपाल यांना नेमक्या कोणत्या भागात शिकारीसाठी नेण्यात आले होते? ते बेपत्ता झाल्यानंतर सुरुवातीला कोणत्या परिसरात शोध घेण्यात आला? पोलिस तपास सुरू झाल्यानंतर संबंधितांनी दाखविलेल्या ठिकाणीच बाराव्या दिवशी कपडे आणि मानवी अवशेष कसे आढळले? घटनास्थळी सापडलेले अवशेष नेमके कोणाचे आहेत? गोपाल यांचा मृत्यू नेमका कशामुळे झाला? या प्रश्नांची उत्तरे अद्याप मिळालेली नाहीत.

### कुटुंबीयांकडून शोधमोहीम

■ गोपाल यांचे भाऊ विजय राजू घसाडकर यांनी संबंधितांकडे चौकशी करून भावाचा शोध सुरू केला. लेतू टेकाम यांच्या मदतीने खासगी मजूर आणि स्थानिक नागरिकांच्या माध्यमातून जंगल परिसरात शोधमोहीम राबविण्यात आली. मात्र, अनेक दिवस शोध घेऊनही गोपाल यांचा ठावठिकाणा लागला नाही.

### पोलिस तपासाला वेग

■ कुटुंबीयांनी ४ ऑगस्ट रोजी पाटण पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यानंतर पोलिस निरीक्षक मिलिंद सरकटे यांनी प्रकरणाची गंभीर दखल घेत तपासाला वेग दिला. पोलिसांनी लेतू सीताराम टेकाम, राजू फुलाजी आत्राम आणि सुनील चप्पत टेकाम यांच्याकडे चौकशी केली. तपासादरम्यान काही बाबी संशयास्पद आढळल्याने तिघांना चौकशीसाठी ताब्यात घेण्यात आल्याची माहिती आहे. त्यानंतर पोलिसांनी त्यांना गोपाल यांचा शोध घेण्यासाठी सोबत घेतले.

# अस्वलाच्या हल्ल्यात वृद्ध शेतकरी बचावला

प्रतिनिधी ११ ऑगस्ट



**उमरखेड** : पैनगंगा अभयारण्यातील भवानी बिटमध्ये शेताकडे जात असलेल्या ७० वर्षीय शेतकऱ्यावर अस्वलाने अचानक हल्ला केल्याची घटना शनिवारी (८ ऑगस्ट) सकाळी साडेसातच्या सुमारास घडली. या हल्ल्यात शेतकरी गंभीर जखमी झाला असून, त्याने आरडाओरड केल्याने अस्वलाने तेथून पळ काढला. त्यामुळे त्याचा जीव बालंबाल बचावला.

देवराव भिकूमुडे (वय ७०, रा. चिखली, ता. उमरखेड) असे जखमी शेतकऱ्याचे नाव आहे. ते सकाळी चिखली येथून भवानीजवळील माळावरील शेताकडे जात होते. जंगलातील रस्त्यावरून जात असताना अचानक समोर आलेल्या अस्वलाने त्यांच्यावर हल्ला चढविला. अस्वलाने त्यांच्या पाय, हात आणि तोंडावर गंभीर जखमा केल्या. त्यांनी आरडाओरड केल्याने अस्वलाने तेथून पळ काढला.

घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी देवराव भिकूमुडे यांना कोरटा प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल केले. प्रकृती चिंताजनक असल्याने प्राथमिक उपचारानंतर त्यांना किनवट उपजिल्हा रुग्णालयात हलविण्यात आले.

दरम्यान, वनपरिक्षेत्र अधिकारी व्ही. एन. झांबरे (कोरटा) आणि एस. एस. पांडे (बिटरगाव) यांनी घटनास्थळाची पाहणी केली. वनविभागाने पंचनामा केला आहे. अभयारण्य परिसरात वन्यप्राण्यांचा वावर वाढल्याने शेतकरी व नागरिकांनी सेंच्युरी क्षेत्रात प्रवेश करू नये, असे आवाहन वनविभागाने केले आहे.

**पंधरा वर्षांपूर्वीच्या घटनेची आठवण** : सुमारे १५ वर्षांपूर्वी बोरगाव जंगलाजवळ पैनगंगा नदी ओलांडताना जयस्वाल पिता-पुत्रींवर अस्वलाने हल्ला केला होता. या हल्ल्यात दोघांचा मृत्यू झाला होता. त्यामुळे शनिवारी झालेल्या हल्ल्याने परिसरातील नागरिकांमध्ये पुन्हा भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

# डंपरची दुचाकीला धडक; तरुणाचा मृत्यू, वडील गंभीर जखमी

प्रतिनिधी ११ ऑगस्ट



**यवतमाळ** : कळंब तालुक्यातील मेटीखेडा चौफुली येथे ओबेरॉय कंपनीच्या डंपरने दुचाकीला मागून जोरदार धडक दिल्याने झालेल्या अपघातात १८ वर्षीय तरुणाचा उपचारादरम्यान मृत्यू झाला, तर त्याचे वडील गंभीर जखमी झाले. ही घटना १० जुलै रोजी सायंकाळी पाचच्या सुमारास घडली.

अभिजित रमेश चिंचाळकर (वय १८) हा आपल्या वडील रमेश हरिभाऊ चिंचाळकर यांच्यासोबत दुचाकीवरून गावाहून मोहदा येथे जात होता. मेटीखेडा ते मोहदा या मार्गावर सिमेंट रस्त्याचे काम सुरू आहे. दरम्यान, मेटीखेडा चौफुलीजवळ त्यांच्या दुचाकीला ओबेरॉय कंपनीच्या डंपरने मागून जोरदार धडक दिली. या धडकेत अभिजित व त्याचे वडील रस्त्यावर कोसळले. अभिजितच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली. त्याला तातडीने यवतमाळ येथील क्रिटीकेअर रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. मात्र, डोक्याला झालेली गंभीर दुखापत उपचाराला प्रतिसाद न दिल्याने त्याचा मृत्यू झाला. या अपघातात रमेश चिंचाळकर हेही गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. अपघातामुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून, रस्त्याचे काम सुरू असताना वाहतूक सुरक्षेच्या उपाययोजनांचा अभाव असल्याचा मुद्दाही उपस्थित केला जात आहे.

# महिलेच्या पर्समधून ७० हजारांचा ऐवज लंपास

प्रतिनिधी ११ ऑगस्ट

## दागिने, रोकड व महत्त्वाची कागदपत्रे चोरीस

**उमरखेड** : मुळावा येथून बारड येथे जाण्यासाठी उमरखेड बसस्थानकात आलेल्या महिलेच्या पर्समधून अज्ञात चोरट्याने सोन्याचे दागिने, रोकड आणि महत्त्वाची कागदपत्रे असा सुमारे ७० हजार रुपयांचा ऐवज लंपास केला. ही घटना सोमवारी (१० ऑगस्ट) दुपारी दोनच्या सुमारास घडली.

शकुंतला शाम पवार (वय ५०, रा. बारड, ता. मुदखेड, जि. नांदेड) यांनी याबाबत उमरखेड पोलिस ठाण्यात तक्रार दिली आहे. पवार या मुळावा येथील नातेवाइकांच्या घरी गेल्या होत्या. सोमवारी नातेवाइकांच्या मुलीसोबत त्या ऑटोने उमरखेडला आल्या. देवसरकर पेट्रोलपंपाजवळ उतरून दोघी पायी बसस्थानकात गेल्या. दुपारी दोनच्या सुमारास लातूरकडे जाणारी बस बसस्थानकात आली. बसमध्ये मोठी गर्दी असल्याने दोघींनी गर्दीतून बसमध्ये प्रवेश केला. बसमध्ये बसल्यानंतर तिकीट काढण्यासाठी पर्स पाहिली असता तिची चैन उघडी असल्याचे पवार यांच्या लक्षात आले. पर्समधील गुलाबी रंगाचे पाकीट गायब असल्याचे दिसून आले. या पाकिटात सुमारे पाच ग्रॅम वजनाची सोन्याची चैन, सात ग्रॅमचे शॉर्ट गंठन, दोन सोन्याच्या अंगठ्या, सोन्याचे कानातले, दोन 'ॐ'च्या आकाराचे दागिने, रिंग प्रकारातील सोन्याचे कानातले तसेच चांदीचा गणपती-लक्ष्मी-सरस्वती असलेला सिक्का होता. याशिवाय १ हजार ५०० रुपये रोख, आधारकार्ड आणि पॅनकार्डही पाकिटात होते.

सोन्या-चांदीच्या दागिन्यांची किंमत सुमारे ६८ हजार ५०० रुपये असून, रोख रकमेसह एकूण ७० हजार रुपयांचे नुकसान झाल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. चोरी लक्षात आल्यानंतर पवार आणि त्यांच्या नातेवाइकांनी बस तसेच परिसरात पाकिटाचा शोध घेतला; मात्र ते मिळून आले नाही. बसमधील गर्दीचा फायदा घेत अज्ञात व्यक्तीने पर्समधील पाकीट चोरल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. या प्रकरणी पवार यांनी उमरखेड पोलिस ठाण्यात जबानी रिपोर्ट देऊन अज्ञात चोरट्याचा शोध घेऊन कायदेशीर कारवाई करण्याची मागणी केली आहे. पोलिस निरीक्षक शंकर पांचाळ यांच्या मार्गदर्शनाखाली बीट जमादार संदीप ठाकूर पुढील तपास करीत आहेत.

# अल्पवयीनाकडून दोन घरफोड्या उघडकीस

प्रतिनिधी ११ ऑगस्ट



**उमरखेड** : शहरात गेल्या काही दिवसांपासून चोरी व घरफोडीच्या घटनांमध्ये वाढ झाल्याने नागरिकांमध्ये चिंता निर्माण झाली होती. या पार्श्वभूमीवर उमरखेड पोलिसांच्या डी.बी. पथकाने सीसीटीव्ही फुटेज, तांत्रिक विश्लेषण आणि गोपनीय माहितीच्या आधारे दोन घरफोडीचे गुन्हे उघडकीस आणले. या प्रकरणात एका अल्पवयीन विधीसंघर्षग्रस्त बालकाची पालकांच्या उपस्थितीत चौकशी केली असता त्याने दोन्ही घरफोड्या केल्याची कबुली दिल्याची माहिती पोलिसांनी दिली. चोरीच्या रकमेतून खर्च केल्यानंतर शिल्लक असलेली ९ हजार ५०० रुपयांची रोकड जप्त करण्यात आली.

२७ जुलै रोजी पहाटे कृषी उत्पन्न बाजार समिती परिसरातील हॉटेलमध्ये, तर ९ ऑगस्ट रोजी पहाटे ढाणकी रोडवरील न्यू विदर्भ कोल्डीक हॉटेलमध्ये घरफोडी झाल्याची नोंद होती. या गुन्ह्यांचा तपास करण्याचे आदेश वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिल्यानंतर डी.बी. पथकाने तपासाला वेग दिला.

ही कारवाई जिल्हा पोलिस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलिस अधीक्षक अशोक थोरात, प्रभारी उपविभागीय पोलिस अधिकारी अमर मोहिते आणि उमरखेड पोलिस निरीक्षक शंकर पांचाळ यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

डी.बी. प्रमुख पोलिस उपनिरीक्षक शरद लोहकरे, सहायक फौजदार विजय पतंगे, पोलिस हवालदार चंदन जाधव, जय राठोड, प्रकाश बोंबले, गिरीष बेंद्रे, तसेच पोलिस कर्मचारी संघशिल टेंभरे, विष्णू राठोड, दिगंबर गिते आणि निवृत्ती महाळनवर यांनी कारवाईत सहभाग घेतला.

# धनश्री ज्वेलर्स चोरीचा छडा; २२४ ग्रॅम सोने हस्तगत

प्रतिनिधी ११ ऑगस्ट

## मध्य प्रदेशातील तिघांना अटक; दुचाकीसह मुद्देमाल जप्त



**यवतमाळ** : बाभूळगाव शहरातील धनश्री ज्वेलर्स फोडून सुमारे १७ लाख ७० हजार रुपयांचे सोन्याचे दागिने लंपास करणाऱ्या टोळीचा पोलिसांनी छडा लावला आहे. स्थानिक गुन्हे शाखा आणि बाभूळगाव पोलिसांनी केलेल्या संयुक्त कारवाईत तीन संशयितांना अटक करण्यात आली असून, त्यांच्या ताब्यातून चोरीच्या मुद्देमालापैकी २२४ ग्रॅम सोन्याचे दागिने आणि गुन्ह्यात वापरलेली दुचाकी हस्तगत करण्यात आली आहे.

पोलिसांच्या माहितीनुसार, २७ जुलैच्या मध्यरात्री धनश्री ज्वेलर्स दुकानाची रेकी करून चोरट्यांनी दुकान फोडले. मनी, बदामी अंगठ्या, डोरले, लहान-मोठे कानातील डूल आदी सोन्याचे दागिने चोरीला गेले. याप्रकरणी दुकानमालक जितेंद्र प्रेमचंद तातेड यांनी दिलेल्या तक्रारीवरून बाभूळगाव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलिस अधीक्षक कुमार चिंता यांच्या मार्गदर्शनाखाली तपासासाठी विविध पथके तयार करण्यात आली. घटनास्थळी फिंगरप्रिंट तज्ज्ञ, श्वान पथक आणि न्यायवैद्यक प्रयोगशाळेच्या पथकाने पाहणी केली. दुकानातून मिळालेल्या ठशांच्या आधारे तपासाला दिशा मिळाली. दरम्यान, पोलिसांनी परिसरातील २३ सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे फुटेज तपासले. फुटेजमध्ये चोरटे दुकानात प्रवेश करताना आणि चोरीचा मुद्देमाल घेऊन जाताना अस्पष्टपणे दिसून आले. तांत्रिक तपास आणि ठसे तज्ज्ञांच्या अहवालाच्या आधारे पोलिसांनी संशयितांचा माग काढला. तपासादरम्यान पोलिसांनी अजय मोहन काळे ऊर्फ पारधी (२६, रा. रुसीया, ता. कुरवई, जि. विदिशा, मध्य प्रदेश), विनोद वानसोब पवार (४६, रा. मोगरा पारधी बेडा, अमरावती) आणि मंगलसिंग ऊर्फ बबलू सुरेश पारधी (१९, रा. मुरादपूर, ता. बामोरी, जि. गुना, मध्य प्रदेश; सध्या सिराजपूर फाटा, कन्नड) यांना ५ ऑगस्ट रोजी ताब्यात घेतले. तपासादरम्यान आरोपींकडून मिळालेल्या माहितीनुसार ६ ते १० ऑगस्टदरम्यान २२४ ग्रॅम सोन्याचे दागिने व गुन्ह्यात वापरलेली दुचाकी हस्तगत करण्यात आली. उर्वरित आरोपींचा शोध सुरू असल्याचे पोलिसांनी सांगितले.

ही कारवाई पोलिस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलिस अधीक्षक अशोक थोरात आणि सहायक पोलिस अधीक्षक तथा उपविभागीय पोलिस अधिकारी अमोल कोळी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक सतीश चवरे, बाभूळगाव ठाणेदार दीपमाला भेंडे यांच्यासह पोलिस अधिकारी व कर्मचाऱ्यांनी तपासात सहभाग घेतला.

सिटी न्यूज सुपरफास्ट अमरावती
मंगळवार, दि. ११ ऑगस्ट २०२६ Web. http://epaper:citynewssuperfast.com



# श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालयात करिअर कट्टा इंडक्शन व अवेअरनेस कार्यक्रम उत्साहात संपन्न

प्रतिनिधी ११ ऑगस्ट

**अमरावती :** श्री. शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती द्वारा संचालित श्री. शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावती येथे महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग तसेच महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येणाऱ्या करिअर कट्टा उपक्रमांतर्गत दि. ५ ऑगस्ट २०२६ रोजी करिअर कट्टा इंडक्शन व अवेअरनेस कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.



महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जी. व्ही. कोरपे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या कार्यक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये करिअर कट्टा उपक्रमाविषयी जागरूकता निर्माण करणे तसेच करिअर विकास, कौशल्यवृद्धी, उद्योजकता, नवोपक्रम आणि सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासासाठी उपलब्ध संधींची माहिती करून देणे हा होता.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन तसेच डॉ. पंजाबराव उर्फ भाऊसाहेब देशमुख आणि संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली.

प्रमुख वक्त्या म्हणून उपस्थित अमरावती जिल्हा समन्वयक डॉ. ममता पळसपगार यांनी विद्यार्थ्यांना करिअर कट्टा उपक्रमाची सविस्तर माहिती देत विविध उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेण्याचे आवाहन केले. स्टार्टअप अँड एंटरप्रेन्युअरशिप डेव्हलपमेंट सेलचे समन्वयक डॉ. दिनेश खेडकर यांनी प्रास्ताविकातून कार्यक्रमाची उद्दिष्टे स्पष्ट केली. तसेच अमरावती जिल्हा समन्वयक डॉ. रेखा मग्गिरवार यांनी विद्यार्थ्यांना करिअर कट्टा अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांमध्ये मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन केले.

या कार्यक्रमास महाविद्यालयातील १७५ हून अधिक विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त उपस्थिती दर्शविली. करिअर कट्टा हा महाराष्ट्र शासनाचा विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी राबविण्यात येणारा महत्त्वपूर्ण उपक्रम असून, विद्यार्थ्यांमध्ये रोजगारक्षम कौशल्ये, नेतृत्व क्षमता, सामाजिक उत्तरदायित्व, नवोपक्रमाची वृत्ती आणि उद्योजकीय मानसिकता विकसित करण्यासाठी तो प्रभावी ठरत आहे. विशेष म्हणजे "करिअर कट्टा इंडक्शन अँड अवेअरनेस वीक" या उपक्रमाची वर्ल्ड बुक ऑफ रेकॉर्ड्समध्ये नोंद होत असल्यामुळे या कार्यक्रमाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

# वीरेंद्रभाऊ जगताप यांच्या वाढदिवसानिमित्त चांदूर रेल्वेत विविध सामाजिक व शैक्षणिक उपक्रम

प्रतिनिधी ११ ऑगस्ट

**चांदूर रेल्वे:** माजी आमदार प्रा. वीरेंद्रभाऊ जगताप यांच्या वाढदिवसानिमित्त तसेच नगरसेविका अॅड. कीर्तीताई राहुल इमले आणि नगरसेवक तथा गटनेता मो. अनिस सौदागर यांच्या वाढदिवसानिमित्त चांदूर रेल्वे शहरात विविध सामाजिक व शैक्षणिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

मंगळवार, दि. ११ ऑगस्ट २०२६ रोजी दिवसभर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून, सामाजिक बांधिलकी जपत रुग्णसेवा, गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव आणि विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात येणार आहे.

या उपक्रमाची सुरुवात सकाळी १० वाजता ग्रामीण रुग्णालय, चांदूर रेल्वे येथे रुग्णांना फळवाटप करून करण्यात येणार आहे. त्यानंतर सकाळी ११ वाजता यशवंत लॉन्स, चांदूर रेल्वे येथे महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्या शिष्यवृत्ती



परीक्षेत यश संपादन केलेल्या ११० गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला आहे.

यावेळी शहरातील गुणवंत विद्यार्थ्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप देत त्यांच्या शैक्षणिक यशाचा गौरव करण्यात येणार आहे. तसेच न. प. हुतात्मा स्मारक अभ्यासिका येथील विद्यार्थ्यांसाठी पुस्तक भेट वितरणाचा उपक्रमही याच ठिकाणी राबविण्यात येणार आहे.

विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाची गोडी निर्माण व्हावी, त्यांच्या गुणवत्तेला प्रोत्साहन मिळावे आणि शहरातील युवा पिढीला ज्ञानाच्या दिशेने प्रेरणा मिळावी, या उद्देशाने या उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

या सर्व कार्यक्रमांसाठी माजी आ. वीरेंद्रभाऊ जगताप मित्र परिवार, चांदूर रेल्वे यांच्या वतीने नागरिक, विद्यार्थी, पालक, शिक्षक, सामाजिक कार्यकर्ते व कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

कार्यक्रमासाठी सर्वांनी मंगळवार, दि. ११ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ९.४५ वाजता पक्ष कार्यालय, पोलीस स्टेशनसमोर, चांदूर रेल्वे येथे उपस्थित राहावे.

कार्यक्रमाचे स्वरूप रुग्णसेवा – फळवाटप सकाळी १०.०० वाजता, ग्रामीण रुग्णालय, चांदूर रेल्वे ११० गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा (शिष्यवृत्ती परीक्षा यशस्वी विद्यार्थ्यांचा गौरव) सकाळी ११.०० वाजता, यशवंत लॉन्स, चांदूर रेल्वे, पुस्तक भेट वितरण (न. प. हुतात्मा स्मारक अभ्यासिका येथील विद्यार्थ्यांसाठी) यशवंत लॉन्स, चांदूर रेल्वे असे कार्यक्रमाचे स्वरूप राहणार असल्याचे आयोजकांनी सांगितले.

# दरोडा टाकणारे आरोपी जेरबंद

प्रतिनिधी ११ ऑगस्ट

**अमरावती :** दरोडा टाकणाऱ्या आरोपींना स्थानिक ग्रामीण गुन्हे शाखेने जेरबंद केले आहे. रितेश केशव महापात्रा २४, रा. खडकी अकोला, गौरव विनोद डोंगरे १९, रा. खडकी अकोला, श्रेयस उमेश इंगळे २०, रा. कान्हेरी अकोला आणि खडकी भागातील विधीसंघर्ष बालक आहे.

पोलीस स्टेशन लोणी येथे ०५/०८/२०२६ रोजी तकारदार सुनील एकनाथराव अजमिरे यांनी तक्रार दिली की, ते ग्राम जहागीरपुर येथे त्यांचे शेत शिवारामध्ये मोटारसायकलने सकाळी ०७/०० वा. अमरावती येथुन बडनेरा लोणी मार्गे अकोली जाहीगीर येथे जात असतांना बेलोरा गावा समोर हायवेवर vjv फार्म जवळ ०४ अनोळखी पुरुषांनी येवुन



फिर्यादीच्या मोटरसायकलची चावी काढुन मोटरसायकल बंद केली. व फिर्यादीच्या शर्टाच्या खिशातुन मोबाईल व गाडीची चावी शेतामध्ये दुर फेकुन दिली व शर्टाचे खिशातील पाचेश रु च्या ४ नोटा असे एकुण २०००/- रुपये जबरीने काढुन घेतले बाबत पो. स्टे लोणी येथे गुन्हा दाखल आहे.

पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांनी, स्थानिक गुन्हे शाखेला सूचना दिल्या. गुन्ह्याचा समांतर तपास करीत असता ०९/०८/२०२६ रोजी माहिती मिळाली की, लोणी येथील हायवे वरील चोरी खडकी अकोला येथे राहनारा रितेश महापात्रा याने त्याचे साथीदारासह केली आहे व तो सध्या त्याचे साथीदारासह रेल्वे स्टेशन परीसर अकोला येथे फिरत आहे. अशा माहिती वरून स्था.गु.शा चे पथक अकोला येथे रवाना होवून अकोला रेल्वे स्टेशन परिसरात रितेश महापात्रा याचा शोध घेतला असता तो त्याचे साथीदारासह रेल्वे स्टेशन अकोला परीसरातील ऑटो पार्कींग जवळ संशईतरित्या फिरत असताना दिसला. त्यांना पंचासमक्ष ताब्यात घेतले. रितेश केशव महापात्रा, गौरव विनोद डोंगरे रा. खडकी, श्रेयस उमेश इंगळे रा. कानेरी असे सांगितले. गुन्हयाबाबत विचारपुस केली असता त्यांनी प्रथम उडवाउडवीची उत्तरे दिली. त्यानंतर रितेश महापात्रा याने घटनाक्रम सांगितला. तक्रारदाराकडून हिसकावून घेतलेले नगदी २००० रुपये, गुन्हयामध्ये वापरलेली मोटारसायकल, ३ मोबाईल असा १,०३,०००/- रू. चा मुद्देमाल जप्त केला. तपासासाठी पो.स्टे लोणीच्या ताब्यात देण्यात आले. पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांच्या आदेशाने अपर पोलीस अधिक्षक दत्ता तोटेवाड यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखा निरीक्षक अशोक लांडे यांचे नेतृत्वात पो.उप. नि. रोहीत कुदळे, प्रवीण अंबाडकर, गुनवंत सिरसाठ यांनी केली.

# अमरावतीत संयुक्त कामगार कर्मचारी संघटना कृती समिती व संयुक्त किसान मोर्चाचे जेलभरो आंदोलन

प्रतिनिधी ११ ऑगस्ट

**अमरावती:** संयुक्त कामगार संघटना कृती समिती व संयुक्त किसान मोर्चा अमरावतीच्या वतीने विविध मागण्या संदर्भात आज मोर्चा काढण्यात आला. जिल्हाधिकारी कार्यालया समोर आंदोलकांनी घोषणाबाजी केली.

यावेळी पोलिसांचा चोख बंदोबस्त होता. आंदोलकांना पोलिसांनी ताब्यात घेतले.

संयुक्त कामगार संघटना व संयुक्त किसान मोर्चाच्या वतीने १० ऑगस्ट रोजी अमरावती जिल्हाधिकारी कार्यालया समोर हज़ारो कामगार,



कर्मचारी, शेतकरी, शेतमजूर यांनी जेलभरो आंदोलन करून अटक करुन घेतली. २०१४ ला सत्तेतर आलेल्या अच्छे दिन वाल्या सरकारच्या १२ वर्षाच्या कार्यकाळात कामगार, कर्मचारी, शेतकरी, शेतमजुर, युवक, विद्यार्थी व महिला विरोधी धोरणाचा अवलंब केला. रोजगार, आरोग्य, शिक्षण या मूलभूत गरजा पासुन वंचित केले असा आरोप केला.

कॉर्पोरेट धार्जिण्या व कामगार विरोधी चार श्रम संहिता त्वरित रद्द करा, सर्व कामगारांना आठ तासाच्या कामासाठी किमान वेतन 30 हजार रुपये लागू करा , आंगनवाड़ी कर्मचारी, आशा वर्कर्स, शालेय पोषण कामगार, राष्ट्रीय आरोग्य अभियान कर्मचारी या सर्व योजना कर्मचारी यांना सरकारी कर्मचारी दर्जा देवून त्याना पेंशन, प्रॉविडेंट फंड, ईएसआयसी या सर्व सामाजिक सुरक्षा लागू करा आदी मागण्या केल्या. सीटू संघटनेचे नेते

अंकुश वाघ, राजेंद्र भांबेरे, ओमप्रकाश वाघमारे, रमेश सोनुले, चंदाताई वानखडे, रेखा वानखडे, रेहाना खान, नीलू मेश्राम, सुनीता भोवले, उज्वला लाड, मीनाताई कापसे, वहिदा कलाम, शमा परवीन, लता मावदे यांच्यासह शेकडो कार्यकर्ते सहभागी होते.

# सरकारी व वन जमिनीचे नियमितीकरण करण्यासाठी उपविभागीय अधिकाऱ्यांना दिले निवेदन

प्रतिनिधी ११ ऑगस्ट

**धारणी:** धारणी तालुक्यातील बोथरा येथील आदिवासी व इतर पारंपारिक शेतकऱ्यांच्या वाहितीखालील सरकारी व वनजमिनीचे नियमितीकरण करून ७/१२ उताऱ्यावर शेती कसणाऱ्यांची नावे लावण्याबाबत उपविभागीय अधिकारी मा. सिद्धार्थ शुक्ला व गटविकास अधिकारी पंचायत समिती धारणी यांना धनंजय सायरे समता फेलो कोरो इंडिया यांच्या मार्गदर्शनाखाली व सदर निवेदक यांनी निवेदन देण्यात आले. निवेदनामध्ये गेल्या अनेक वर्षांपासून ( सन १९९०-९९) किंवा त्या पूर्वीपासून मौजा बोथरा येथील जमिनीवर उपजिविकेसाठी शेती करत असून शांततापूर्वक ताबा बाळगून असल्याचे सांगितले. ताबा असताना महसूल व वन विभागाने



वेळोवेळी कायदेशीर कारवाई दंड पावती, सन २००७-२००८ मध्ये नायब तहसीलदार कार्यालय धारणी यांच्याकडून अतिक्रमण जमिनीचे पट्टे मिळण्याबाबत/ चौकशीबाबत नोटिसा प्राप्त झाल्या होत्या. शासनाला प्रदान केलेल्या एकत्रित जमीन महसुलाच्या रकमेची पावती देण्यात आली होती. असे असताना आजमितीस या जमिनी महसूल/वनविभागाच्या नावे सरकारी म्हणून नोंदवलेल्या आहेत.आम्हाला अद्याप आमचा हक्काचा ७/१२ उतारा मिळालेला नाही.७/१२ उतारा नसल्यामुळे शासकिय योजना, पिक कर्ज, किंवा नैसर्गिक आपत्तीच्या वेळी कोणतीही मदत मिळत नसल्याचे वंचित शेतकऱ्यांनी सांगितले. हा परिसर पेसा (PESA) आणि अनुसूचित क्षेत्रात येत असल्याने तसेच ताबा १३ डिसेंबर २००५ च्या पूर्वीचा असल्याने ' अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी वन हक्क मान्यता) अधिनियम २००६ मधील कलम ३(१)(अ) आणि महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६' च्या प्रचलित नियमितीकरण धोरणानुसार जमिनीच्या मालकी हक्कास ७/१२ उताऱ्यास पूर्णपणे पात्र असल्या बाबतचे तसेच तात्काळ पडताळणीचे आदेश देऊन जमिनीचे रीतसर नियमितीकरण करून ७/१२ उताराच्या मालकी/ भोगवतदार रकान्यात सदर शेतकऱ्याचे नावे लावण्यात यावे असे निवेदन दिले .

# दर्यापुरात बनावट सह्यांच्या प्रकरणाला नवा ट्विस्ट!

## १५ ऑगस्टला युवासेना जिल्हाप्रमुख अंकुश पाटील कवडकर यांचा उपोषणाचा इशारा

प्रतिनिधी ११ ऑगस्ट

**दर्यापूर :** दर्यापूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सचिवांच्या कारभारासंदर्भात वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे सादर करण्यात आलेल्या तक्रार अर्जावरून सुरू झालेल्या वादाला आता नवा ट्विस्ट मिळाला आहे. तक्रार अर्जामध्ये आठ व्यक्तींची नावे आणि सह्या त्यांच्या संमतीशिवाय वापरण्यात आल्याचा आरोप करण्यात आला होता. याप्रकरणी संबंधितांनी पोलिसांकडे तक्रार दाखल केल्यानंतर आता थेट अमरावती जिल्हा सहनिबंधक कार्यालयातही आपली भूमिका मांडण्यात आली आहे.

२० जुलै २०२६ रोजी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सचिवांच्या कारभारासंदर्भात विभागीय सहनिबंधक आणि



इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे तक्रार अर्ज साद करण्यात आला होता.

मात्र, संबंधित 8 व्यक्तींनी सदर तक्रारीशी आपला कोणताही संबंध नसल्याचे स्पष्ट केले आहे. तक्रार अर्जातील मजकुराची आपल्याला कोणतीही माहिती नसून, आपल्या नावासमोर करण्यात आलेल्या सह्या आपल्याच नसल्याचा दावा त्यांनी केला आहे.

यानंतर संबंधित व्यक्तींनी दर्यापूरच्या उपविभागीय पोलीस अधिकाऱ्यांकडे लेखी तक्रार दाखल करून कथित बनावट सह्या आणि नावांच्या गैरवापराची सखोल चौकशी करण्याची मागणी केली. दरम्यान, 10 ऑगस्ट रोजी अमरावती जिल्हा सहनिबंधक कार्यालयात या प्रकरणासंदर्भात चौकशी झाली. यावेळी युवासेना जिल्हाप्रमुख अंकुश पाटील कावडकर, पत्रकार विक्की उर्फ किरण होले, पत्रकार सुरज देशमुख यांनी आपली बाजू मांडली. सदर तक्रार पोस्टाच्या माध्यमातून करण्यात आल्याचे समोर आल्याने, ही तक्रार नेमकी कोणी केली, संबंधित व्यक्ती कोण आहे आणि तक्रार अर्जावर संबंधित आठ व्यक्तींची नावे व सह्या कशा वापरण्यात आल्या, याचा शोध घेण्याची मागणी करण्यात आली. संबंधित व्यक्तीचा लवकरात लवकर शोध घेऊन त्याच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

# रिद्धपूर अपघातानंतर खा. डॉ. अनिल बोंडे आक्रमक; स्कूल बसेससाठी कडक नियमावली लागू करण्याची जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी

**अमरावती:** मोर्शी तालुक्यातील रिद्धपूर येथे स्कूल बसच्या धडकेत ७ वर्षीय चिमुकलीचा झालेला दुर्दैवी मृत्यू अत्यंत वेदनादायी असून, या पार्श्वभूमीवर अमरावती जिल्ह्यातील सर्व स्कूल बसेस व विद्यार्थी वाहतूक करणाऱ्या वाहनांसाठी कडक सुरक्षितता नियमावली लागू करण्याची मागणी खासदार डॉ. अनिल बोंडे यांनी केली आहे. याबाबत त्यांनी अमरावती जिल्हाधिकाऱ्यांना पत्र पाठवून आरटीओ, पोलीस, शाळा व्यवस्थापन आणि बस चालकांची तातडीने संयुक्त बैठक घेण्याचे निर्देश दिले आहेत.



खासदार बोंडे यांनी पत्रात नमूद केले की, जिल्ह्यातील अनेक शाळांच्या वाहनांमध्ये प्रशिक्षित चालक व विद्यार्थ्यांची काळजी घेण्यासाठी कंडक्टर/ परिचारक नसतात, ज्यामुळे असे गंभीर अपघात घडतात. त्यामुळे हा सर्व योजना तातडीने राबवण्याची मागणी कमी केली. यासंदर्भात इतरही विभागांनी संयुक्तरीत्या बैठक घेण्याच्या सूचना त्यांनी केल्या आहेत. अमरावती जिल्ह्यातल्या इतरही मतदारसंघांमध्ये जनजागृती व्हावी यासाठी डॉ.अनिल बोंडे यांनी जिल्ह्यातील सर्व लोकप्रतिनिधींना पत्र पाठवून याबाबत माहिती दिली आहे.

# देशी कटट्याने फायरींग करून खुनाचा प्रयत्न करणाऱ्या तसेच कट रचणाऱ्या आरोपींना अटक

प्रतिनिधी ११ ऑगस्ट

**अमरावती:** देशी कटट्याने फायरींग करून खुनाचा प्रयत्न करणा-या तसेच कट रचणा-या आरोपीतांना 24 तासाच्या आत अटक केली आहे. ही कारवाई अमरावती शहर गुन्हे शाखेने केली.

०९/०८/२०२६ रोजी पोलीस स्टेशन गाडगे नगर हददीतील अर्जुन नगर येथे विपुल ठाकरे यांचे घरावर देशी कटयातुन फायर करण्यात आले आहे अशी माहीती डायल ११२ ला प्राप्त झाल्याने सदर घटनास्थळावर गाडगे नगर पोलीस स्टेशन व गुन्हे शाखेचा स्टाफ व इतर वरिष्ठ अधिकारी यांनी तात्काळ भेट दिली असता कोणीतरी बुरखाधारी दोन अज्ञात इसमाने विपुल ठाकरे यांचे घरावर फायरीग केल्याचे दिसुन आल्याने पोलीस स्टेशन गाडगे नगर येथे गुन्हा दाखल झाला.



पोलीस आयुक्त यांनी सदर गुन्हा हा अतिशय संवेदनशिल असल्याने गुन्हे शाखेचे एकुण ६ पथके तयार करून त्यांना सदरचा गुन्हा तात्काळ उघडकिस आणने करीता तसेच गुन्हयात सहभागी असलेल्या आरोपीतांना तात्काळ ताब्यात घेण्याबाबत आदेशित केले होते. त्या अनुषंगाने गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक दिनेश दहातोंडे, पोलीस निरीक्षक अतुल वर यांच्या नेतृत्वात गुन्हे शाखेच्या अधिकारी व अंमलदार यांनी जवळपास १०० पेक्षा अधिक ठिकाणावरील सि.सि.टि. व्हि फुटेज विश्लेषण कले तसेच तांत्रिक विश्लेषण व गुप्त बातमीदारांच्या आधारे खात्री लायक व अचुन माहीती प्राप्त केली. त्या वरून सदर गुन्हा हा बादशहासिंग अजाबसिंग टांक, अजय नुरजेम भोसले या दोघांनी केल्याचे निष्पन्न झाले वरून सदर दोन्ही आरोपीतांना नागपुर महामार्ग तसेच वडाळी परीसरातुन ताब्यात घेतले. त्यांची सखोल विचारपुस केली असता त्यांनी सदरचा गुन्हा केल्याचे कबुल केले. तसेच फिर्यादी यांचे घरावर देशीकट्ट्याच्या आधारे फायरींग करण्याकरीता फिर्यादी यांचे पती नामे विपुल ठाकरे याने बादशासिंग अजाबसिंग टांक याला एकुण १,५०,०००/- रू. देण्याचे कबुल केले होते.

# अमरावती शहरात हलक्या व जड मालवाहू वाहनांना प्रवेशबंदी

प्रतिनिधी ११ ऑगस्ट

## पोलीस प्रशासनाची प्रस्तावित अधिसूचना जारी

**अमरावती :** शहरात वाढती लोकसंख्या, वाहनांची मोठी वर्दळ आणि त्यामुळे होणारे प्राणघातक अपघात रोखण्यासाठी अमरावती शहर पोलीस आयुक्तालयाने शहरातील प्रमुख मार्गांवर हलक्या व जड मालवाहू वाहनांना प्रवेशबंदी घालण्याबाबतची प्रस्तावित अधिसूचना जारी करण्यात आली आहे.

पोलीस उपायुक्त (मुख्यालय) प्रांजली सोनवणे यांनी मुंबई पोलीस कायदा १९५१ चे कलम (१) (ब) आणि मोटर वाहन कायदा १९८८ च्या कलम ११५ अन्वये मिळालेल्या अधिकारांनुसार हे प्रस्तावित आदेश पारित केले आहेत. शहरात सन २०२४ ते जुलै २०२६ या काळात एकूण १,१०८ अपघात झाले आहेत. यातील २१२ प्राणघातक अपघातांमध्ये २४६ निष्पाप नागरिकांचा बळी गेला असून ९१३ व्यक्ती गंभीर व किरकोळ जखमी झाल्या आहेत. ही गंभीर परिस्थिती लक्षात घेता सर्वसामान्य नागरिक व विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी हा निर्णय घेण्यात आल्याचे प्रसिद्धी पत्रात सांगण्यात आले आहे.

दररोज सकाळी ६.३० ते रात्री २१.३० वाजेपर्यंत वाहनांना शहरात प्रतिबंध असणार असून या वाहनांमध्ये मालविरहित (खाली गाडी) वजन २,००० किग्रॅ (२ टन) पेक्षा जास्त असणारी सर्व हलकी व जड व्यावसायिक वाहने. ज्या वाहनांची भारसहित वहन क्षमता २ टनांपेक्षा जास्त आहे अशी सर्व वाहने. सर्व प्रकारची अति अवजड (मल्टी-अॅक्सल) वाहने.

यावेळेत शहरातील जे मार्ग बंद राहतील यामध्ये मुख्य चौक व बायपास मार्ग : गौरी इन वा पॉइंट, वेलकम टी पॉइंट, पंचवटी, इर्विन चौक, जयस्तंभ चौक, राजकमल चौक, गद्रे चौक, नवाथे चौक, बेनाम चौक, अलमास गेट, बडनेरा ते यवतमाळ वाय पॉइंट यांचा समावेश असेल. तसेच नाका व अंतर्गत मार्गांमध्ये राजुरा नाका, विद्यापीठ चौक, बियाणी चौक, जिल्हाधिकारी कार्यालय, इर्विन चौक, दीपक चौक, चित्रा चौक, टांगा पढाव, नागपुरी गेट चौक ते ट्रान्सपोर्ट नगर व भातकुली जकात नाक्यापर्यंत या मार्गांचा समावेश आहे. इतर महत्त्वाच्या मार्गांमध्ये आर.टी.ओ. कार्यालय, शेगाव नाका, कठोरा नाका, पोते पाटील चौक, रहाटगाव बस स्टॉप, विभागीय आयुक्त कार्यालय मार्ग तसेच एम.आय.डी.सी. परिसराचा समावेश आहे. कायमस्वरूपी बंद राहणाऱ्या मार्गांमध्ये गांधी चौक ते रविनगर, गांधी चौक ते राजापेठ आणि गांधी चौक ते अंबापेठ मार्ग. तसेच बजरंग टेकडी ते विलासनगर, पटवा चौक, मोरबाग, मसानगंज. गर्ल्स हायस्कूल चौक ते इर्विन चौक. शहरातील परकोटाच्या आतील दाट लोकवस्तीतील सर्व अंतर्गत मार्गाचा समावेश आहे.

प्रवेशबंदीतून सूट आणि वेळ (अपवाद)अत्यावश्यक सेवांना सूट देण्यात आली आहे. यात पेट्रोल, डिझेल, गॅस, शासकीय धान्य वितरण वाहने, महापालिका कचरा संकलन, अतिक्रमण विभाग, पोलीस, रुग्णवाहिका व अग्निशमन दलाच्या वाहनांना प्रवेशबंदीतून पूर्ण सूट असेल. तसेच या वाहनांना ताशी २० किमीची वेग मर्यादा पाळण्याचे बंधन घालण्यात आले आहे. अन्नधान्य व कृषी माल वाहतूकीला सूट देण्यात आली असून याअंतर्गत दररोज दुपारी ११.०० ते दुपारी १६.०० वाजेदरम्यान ठरवून दिलेल्या मार्गांवरून जसेकी रेल्वे मालधक्का बडनेरा, एमआयडीसी, कृषी उत्पन्न बाजार समिती या भागात वाहतुकीस परवानगी राहील. गौण खनिज वाहतूकीसंदर्भात काही सूचना देण्यात आल्या असून यानुसार दररोज सकाळी ९.०० ते दुपारी १२.०० वाजेपर्यंत विशिष्ट निर्धारित मार्गांवरून वाहतुकीस सूट देण्यात आली आहे. या अधिसूचनेबाबत नागरिकांना किंवा वाहनधारकांना काही आक्षेप अथवा सूचना असल्यास त्यांनी अधिसूचना जारी झाल्यापासून ०७ दिवसांच्या आत आपले आक्षेप लेखी स्वरूपात पोलीस प्रशासनाकडे सादर करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनांवर मोटर वाहन कायदा १९८८ व महाराष्ट्र पोलीस कायदा १९५१ नुसार कठोर कारवाई केली जाईल असेही सांगण्यात आले आहे.

# पथदिवे दुरुस्तीला अखेर सुरुवात!

## काही भागांतील पथदिवे अनेक दिवसांपासून बंद!

प्रतिनिधी ११ ऑगस्ट

**खामगाव :** शहरातील विविध भागांमध्ये अनेक दिवसांपासून बंद पडलेल्या पथदिव्यांच्या दुरुस्तीला अखेर सुरुवात करण्यात आली आहे. त्यामुळे नागरिकांना काहीसा दिलासा मिळाला आहे. विशेषतः बाळापूर मार्गावरील पथदिव्यांची दुरुस्ती अत्यावश्यक बनली होती. काही दिवे पूर्णपणे बंद होते, तर काही वेळोवेळी सुरू-बंद होत असल्याने रात्री नागरिकांना मोठ्या गैरसोयींचा सामना करावा लागत होता.

# साथीचे आजार वाढले; खासगी रुग्णालये हाऊसफूल

# खामगाव शासकीय रुग्णालयात 900 ते 1000 रुग्णांची ओपीडी

प्रतिनिधी ११ ऑगस्ट

**खामगाव :** पावसाळ्यात साथीचे आजार नेहमीच वाढतात. त्यामुळेच आता तालुक्यात साथीचे आजार मोठ्याप्रमाणात वाढू लागले आहे. प्रत्येक घरात सर्दी, ताप, हातपाय दुखी या व इतर आजाराचे रुग्ण दिसून येत आहे.

उपचारासाठी शासकीय रुग्णालयासह शहरातील अनेक खासगी रुग्णालये हाऊसफूल झाले आहे. दररोज शासकीय रुग्णालयात आता ९०० ते १००० रुग्णांची तपासणी केल्या जात आहे. त्यापैकी अनेक रुग्णांना उपचारासाठी भरतीसुध्दा करुन घेतल्या जात आहे. पावसाळ्याच्या दिवसात ग्रामीण भागातून मोठ्याप्रमाणात रुग्ण उपचारासाठी शहरात येतात. अनेक कुटुंबामध्ये सर्दी तापासह इतरही आजाराचे रुग्ण आहे. प्राथमिक उपचारासाठी ते रुग्ण प्रथम गावातीलच खासगी रुग्णालयात जातात. परंतु त्या ठिकाणी आराम पडत नसल्याने ते शहरातील खासगी किंवा शासकीय रुग्णालयात उपचार घेणे पसंत करु लागले आहे.दररोज मोठ्याप्रमाणात उपचारासाठी रुग्ण शहरात येत आहेत. त्यामुळे शहरातील अनेक खासगी रुग्णालयात सकाळपासूनच रुग्णांची गर्दी



झालेली दिसून येते. या साथीचे आजार टाळण्यासाठी काळजी घ्या नदी-नाल्यांना पूर गेल्याने त्या ठिकाणचे पाणी दूषित राहते. हे पाणी अनेकवेळा शेतात काम करणारे मजूर पितात. एवढेच नव्हे तर शेतातील विहिर व बोअरच्याही पाण्यात वाढ झालेली असते. हे पाणी पिण्यात आल्याने साथीचे आजार उद्भवतात. यामुळे प्रामुख्याने ताप, काहींना डोके दुखी, उलट्या, शौचास येणे तसेच सर्दी, खोकला, हात-पाय, दुखणे असे आजार उद्भवतात. अशा रुग्णांनी जवळच्या रुग्णालयात जावून उपचार घेणे महत्त्वाचे असून नदी-नाल्यातील पाणी पिणे टाळावे, पाणी उकळून व गाळून प्यावे, उघड्यावरील अन्नपदार्थ खाणे टाळावे, जेणेकरुन हे आजार टाळता येतील. रुग्णांपैकी काहींना प्राथमिक उपचार म्हणून औषध, गोळ्या दिल्या जातात. तर काहींना उपचारासाठी भरतीसुध्दा केल्या जात आहे. या रुग्णांमध्ये प्रामुख्याने बालक व वृध्दांचा मोठ्याप्रमाणात समावेश आहे.

» उपजिल्हा रुग्णालयात मोठ्याप्रमाणत तालुका व तालुक्याबाहेरील रुग्ण उपचारासाठी येतात. गेल्या काही दिवसापासून रुग्णांमध्ये वाढ झाली होती. परंतु आता तीन ते चार दिवसापासून रुग्णसंख्या कमी होवून ती आता ९०० ते १००० रुग्णांवर आली आहे. दररोज ओपीडीमध्ये सदर रुग्णांची तपासणी केल्या जाते व त्यापैकी काहींना उपचारासाठी भरतीसुध्दा करुन घेतल्या जात आहे.

**- डॉ. निलेश टापरे,** वैद्यकीय अधिक्षक उपजिल्हा रुग्णालय, खामगाव

### साथीचे आजार टाळण्यासाठी काळजी घ्या

» नदी-नाल्यांना पूर गेल्याने त्या ठिकाणचे पाणी दूषित राहते. हे पाणी अनेकवेळा शेतात काम करणारे मजूर पितात. एवढेच नव्हे तर शेतातील विहिर व बोअरच्याही पाण्यात वाढ झालेली असते. हे पाणी पिण्यात आल्याने साथीचे आजार उद्भवतात. यामुळे प्रामुख्याने ताप, काहींना डोके दुखी, उलट्या, शौचास येणे तसेच सर्दी, खोकला, हात-पाय, दुखणे असे आजार उद्भवतात. अशा रुग्णांनी जवळच्या रुग्णालयात जावून उपचार घेणे महत्त्वाचे असून नदी-नाल्यातील पाणी पिणे टाळावे, पाणी उकळून व गाळून प्यावे, उघड्यावरील अन्नपदार्थ खाणे टाळावे, जेणेकरुन हे आजार टाळता येतील.

**- तालुका आरोग्य विभाग,** खामगाव

# शहरात गढूळ पाणी पुरवठा, नागरिकांना जलजन्य आजाराची भिती

प्रतिनिधी ११ ऑगस्ट

**खामगाव :** स्थानिक न. प. च्या वतिने केल्या जाणारा पाणीपुरवठा गढूळ होवू लागला आहे. परिणामी शहरात सर्वत्र जलजन्य आजार वाढण्याची भिती व्यक्त होवू लागली आहे. तर अनेकांनी नळाव्दारे येणारे पाणी पिण्याऐवजी वापरण्यासाठी त्याचा उपयोग करणे पसंत केले आहे. गेल्या आठवड्यात सर्वत्र पाऊस झाल्यामुळे नदी-नाल्यांना पूर गेल्याने शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या गेरु माटरगाव येथील ज्ञानगंगा प्रकल्प हा १०० टक्के भरला आहे. याच प्रकल्पातून शहराला पाणीपुरवठा केल्या जात आहे. परंतु काही दिवसापासून फिल्टर प्लॅंटमधून येणारे पाणीही



गढूळ व पिंगट येवू लागले आहे. याच पाण्याचा पुरवठा शहरात होवू लागला आहे. नळाव्दारे येणारे पाणी गढूळ असल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. या पाण्याने जलजन्य आजार वाढण्याचे भिती व्यक्त केल्या जात आहे. याबाबत काही नागरिकांनी न.प. पाणीपुरवठा विभागाकडे तोंडी तक्रारीसुध्दा केल्या आहे. परंतु प्रकल्पातीलच पाणी गढूळ असल्यामुळे फिल्टर करुनही हे पाणी नितळ होत नसल्याचे पाणी पुरवठा विभागाने म्हटले आहे. त्यामुळे पाणी पुरवठा विभागाच्या वतीने ध्वनिक्षेपणावरून नागरिकांना या गढूळ पाण्याबाबत आवाहनही करण्यात आले असून घरातील स्वच्छ पाणी काळात कोणीही रिचून देवू नये. तसेच येणाऱ्या शहरवासियांना शुध्द व नितळ पाणीपुरवठा केल्या जाईल. असे न. प. पाणीपुरवठा विभागाने म्हटले आहे. शहरातील कूपनलिकेतून पिवळे पाणी नगरपरिषदेने नमुने तपासणीसाठी पाठविले शहरातील जलालपुरा भागात तसेच सतीफैल व इतर काही भागात कूपनलिकेतून येणारे पाणी हे पिवळसर येत असल्याने नागरिकांची चिंता वाढली आहे. दरम्यान सोमवारी तीन चार ठिकाणचे नमुने गोळा करून न. प. मध्ये जाऊ जाऊन ही बाब निर्दशनास आणून देण्यात आली. त्याठिकाणी उपस्थित अधिकारी नाफडे यांनी दखल घेऊन सदर नमुने बुलढाणा येथे पाठविले आहे. तसेच आणखी काही नमुने घेण्यात येणार आहे. या पिवळसर पाण्याने काय त्रास होऊ शकतो? किंवा हे पाणी पिवळसर कसे झाले? तसेच हे पाणी पिण्यासाठी आणि वापरण्यासाठी योग्य की अयोग्य? असे अनेक प्रश्न नागरिकांमध्ये उपस्थित झाले आहे. सर्वप्रथम जलाल पुरा भागातील नागरिक विक्रम अग्रवाल यांनी विविध चार ठिकाणचे नमुने गोळा करून न. प. मध्ये जाऊन दाखविले व लक्ष वेधले. त्यानंतर या विषयाला गती मिळाली. मंगळवारी बुलढाणा येथील भूजल सर्वेक्षण विभागाचे अधिकारी खामगावात येण्याची शक्यता असून हे पाणी पिवळसर कसे झाले याबाबतचे व इतर प्रश्नाची उत्तरे मिळतील, अशी अपेक्षा नागरिकांची आहे.

# सानंदा यांच्या निवेदनाची पालकमंत्र्यांनी घेतली दखल

## ग्रामस्थांनी मानले सानंदा व पालकमंत्री मकरंद आबा पाटील यांचे आभार

प्रतिनिधी ११ ऑगस्ट

**खामगाव :** बुलढाणा जिल्ह्यात गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसाने ग्रामीण भागात मोठा हाहाकार माजवला होता. शेगाव तालुक्यातील माटरगावजवळील पूल पावसामुळे वाहून गेल्याची गंभीर घटना समोर आली होती.घटनेची माहिती कळताच माजी आमदार राणा दिलीपकुमावर सानंदा यांनी सदर घटनास्थळी भेट दिली. पुल वाहुन गेल्याने माटरगाव,बेलुरा आणि माटरगाव खुर्द या तिन गावांचा संपर्क तुटला. नव्हे तर पुल वाहुन गेल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान,शेतकऱ्यांचे शेतमालाला बाजारपेठेत पोहचविण्यासाठी होणारा त्रास यापुढे होवु नये म्हणुन नवीन पुलासाठी जिल्हयाचे पालकमंत्री ना.मकरंदआबा पाटील यांच्याशी भेट घेवुन नवीन पुलासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करणार असल्याचे आश्वासन सानंदा यांनी ग्रामवासीयांना दिले होते. त्या अनुषंगाने दि.०४ ऑगस्ट २०२६ रोजी राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते माजी आमदार राणा दिलीपकुमार सानंदा यांनी मुंबई येथे जावुन बुलढाणा जिल्हयाचे लोकप्रिय पालकमंत्री मकरंदआबा पाटील यांची भेट घेवुन वाहुन गेलेल्या पुलाबाबत माहिती देवुन त्यांना नवीन पुल बांधकामाबाबत निवेदन दिले.पालकमंत्री मकरंद आबा पाटील यांनी सानंदांच्या निवेदनाची तात्काळ दखल घेत जिल्हाधिकारी बुलढाणा अ-कामाची तात्पुरती दुरुस्ती करुन मदत विभागाच्या हेड खाली प्रस्ताव शासनास सादर करावा असा शेरा त्यांनी पत्रकावर लिहुन दिला आहे. माटरगाव पुल दुरुस्त करण्यासाठी माजी आमदार राणा दिलीपकुमार सानंदा यांनी पालकमंत्री यांच्याकडे पाठपुरावा केल्याबदद्ल तसेच पालकमंत्री मकरंद आबा पाटील यांनी तात्काळ कारवाई केल्याबदद्ल माटरगाव,बेलुरा व माटरगाव खुर्द ग्रामस्थांनी त्यांचे आभार मानले.

# सोयाबीन, कपाशी पिकावर किडींचा प्रादुर्भाव वाढला

प्रतिनिधी ११ ऑगस्ट

**खामगाव :** सध्या सोयाबीन व कापूस पिकांवर किडींचा प्रादुर्भाव वाढत असल्याने शेतकऱ्यांनी तातडीने योग्य उपाययोजना करण्याची गरज निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर कृषी विभागाने शेतकऱ्यांना शिफारशीनुसार कीटकनाशक फवारणीबरोबरच 'पक्षी थांबे' उभारण्याचे आवाहन केले आहे.

या संयुक्त उपाययोजनेमुळे किडींचे प्रभावी नियंत्रण साध्य होऊन उत्पादनावर होणारा परिणाम कमी करता येणार आहे. कीडभक्षी पक्षी हे शेतकऱ्यांचे नैसर्गिक मित्र मानले जातात. शेतात पक्षी थांबे उभारल्यास बगळा, मैना, चिमणी, बुलबुल, पावशा तसेच कोतवाल यांसारखे पक्षी थांब्यावर बसून पिकांवरील किडींचे भक्षण करतात. त्यामुळे किडींची संख्या कमी होऊन पिकांचे नुकसान आटोक्यात राहते. याशिवाय, रासायनिक कीटकनाशकांचा वापर कमी होण्यास मदत होत असून, पर्यावरणीय संतुलन राखण्यास व जैवविविधतेच्या संवर्धनासही हातभार लागतो.

# मध्य रेल्वेस्थानकांवरील खाद्यपदार्थ विक्रेत्यांवर कारवाई

## 4 महिन्यांत 7 लाखांचा दंड

प्रतिनिधी ११ ऑगस्ट

**शेगांव :** रेल्वेस्थानकांवर प्रवाशांना निर्धारित दरात दर्जेदार खाद्यपदार्थ व पेये उपलब्ध व्हावीत, यासाठी मध्य रेल्वेच्या भुसावळ विभागाकडून खानपान स्टॉल, ट्रॉली विक्रेते आणि अधिकृत विक्रेत्यांची नियमित तसेच आकस्मिक तपासणी करण्यात येत आहे. निर्धारित कमाल किरकोळ किंमत (रूक्रक्क) पेक्षा अधिक दराने पाणी किंवा खाद्यपदार्थांची विक्री करणाऱ्या विक्रेत्यांविरुद्ध रेल्वे प्रशासनाने कठोर कारवाई सुरू केली आहे. प्रवाशांकडून रेल्वे मदतच्या माध्यमातून पाण्याच्या बाटल्या तसेच विविध खाद्यपदार्थ व पेयांसाठी (रूक्रक्क) पेक्षा जास्त रक्कम आकारल्याच्यातक्रारी प्राप्त होताच. या तक्रारींची दखल घेत भुसावळ विभागाच्या वाणिज्य विभागाकडून स्थानकांवरील खानपान केंद्रांची अचानक तपासणी केली जात आहे. याशिवाय विक्रेत्यांकडून होणाऱ्या इतर व्यावसायिक अनियमिततांवरही प्रशासनाचे लक्ष आहे. तपासणीदरम्यान निर्धारित दरापेक्षा जास्त रक्कम आकारणे किंवा अन्य नियमांचे उल्लंघन केल्याचे आढळल्यास संबंधित विक्रेत्यांविरुध्द रेल्वेच्या नियमांनुसार तत्काळ दंडात्मक कारवाई केली जात आहे. आर्थिक दंडासोबतच आवश्यकतेनुसार इतर शिस्तभंगाची कारवाई देखील करण्यात येत आहे. एप्रिल ते जुलै २०२६ या चार महिन्यांच्या कालावधीत अशा अनियमिततेविरुध्द करण्यात आलेल्या कारवाईत भुसावळ विभागाच्या वाणिज्य विभागाने संबंधित विक्रेत्यांकडून तब्बल ७लाख १० हजार रुपयांचा दंड वसूल केला आहे. त्यामुळे प्रवाशांकडून जादा दर आकारणाऱ्या विक्रेत्यांना चाप बसण्यास मदत होणार आहे. प्रवाशांच्या हितांचे संरक्षण, ग्राहकांच्या अधिकारांचे जतन आणि आवश्यक वस्तू निर्धारित दरात उपलब्ध करून देण्यासाठी रेल्वे प्रशासनाकडून नियमित देखरेख व आकस्मिक तपासणी सुरूच राहणार आहे. दरम्यान, रेल्वे स्थानकावर किंवा रेल्वेगाडीत कोणत्याही खाद्यपदार्थ अथवा पेयासाठी निर्धारित दरापेक्षा अधिक रक्कम आकारली जात असल्यास प्रवाशांनी तातडीने रेल्वे मदतच्या माध्यमातून तक्रार नोंदवावी, असे आवाहन मध्य रेल्वेच्या भुसावळ विभागाने केले आहे.

# पातुर्डा येथे दोघांना सर्पदंश; अल्पवयीन मुलाचा मृत्यू

प्रतिनिधी ११ ऑगस्ट

**संग्रामपूर:** तालुक्यातील पातुर्डा खुर्द येथे दोन दिवसांत सर्पदंशाच्या दोन घटना घडल्या. यातील एका घटनेत १७वर्षीय मुलाचा उपचारादरम्यान मृत्यू झाला, तर दुसऱ्या घटनेतील २५ वर्षीय युवा शेतकऱ्यावर अकोल्यात उपचार सुरू आहेत. माजी सरपंच ज्ञानेश्वर येनकर यांचा मुलगा अमित येनकर हा ८ ऑगस्ट रोजी शेतात फवारणीसाठी टाकीत पाणी भरत असताना त्याला सर्पदंश झाला. त्याला शेगाव येथील साईबाई मोटे रुग्णालयात उपचारासाठी दाखल आले; मात्र करण्यात उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. अमित हा लहानपणापासूनच हुशार विद्यार्थी होता. त्याचे प्राथमिक शिक्षण सातपुडा इंग्लिश कॉन्व्हेंटमध्ये झाले. त्यानंतर नवोदय विद्यालयात निवड झाल्यानंतर त्याने पुढील शिक्षण घेतले. मूर्तिजापूर येथील पॉलिटेक्निकमध्ये त्याला प्रवेश मिळाला होता. १० ऑगस्ट रोजी तो शिक्षणासाठी जाणार होता; मात्र त्यापूर्वीच सर्पदंशाच्या घटनेत त्याचा मृत्यू झाल्याने कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला. याच गावातील २५ वर्षीय सागर झाडोकार यालाही शेतात काम करताना सर्पदंश झाला. त्याला सुरुवातीला शेगाव येथे उपचारासाठी दाखल करण्यात आले. प्रकृती गंभीर असल्याने पुढील उपचारासाठी अकोल्याला रुग्णालयात हलविण्यात आले असून, त्याच्यावर उपचार सुरु आहेत.

# अवघ्या 24 तासांत दुसरा दरोडा; धानोरा येथे महामार्गालगत किराणा दुकान फोडले

## काटीतील दरोडा-हत्येनंतर धानोऱ्यात पुन्हा धाडसी दरोडा; पोलिस प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर नागरिकांचे गंभीर सवाल, मलकापूर ग्रामीण पोलिसांसमोर गुन्हेगारांचे आव्हान!







प्रतिनिधी ११ ऑगस्ट

**मलकापूर :** मलकापूर ग्रामीण पोलीस हद्दीत गुन्हेगारीचे सत्र थांबण्याचे नाव घेत नसून, अवघ्या २४ तासांच्या आत दुसऱ्या दरोड्याची घटना समोर आल्याने ग्रामीण भागातील नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. काटी गावातील दरोडा व त्यात झालेल्या हत्येच्या घटनेनंतर आता धानोरा गावात राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५३ लगत असलेल्या किराणा दुकानावर मध्यरात्री दरोडा पडल्याने पोलिस प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर नागरिकांकडून संताप व्यक्त होत आहे.

**पोलिसांच्या नाकावर टिच्चून दुसरा दरोडा!**

दि.१० ऑगस्ट रोजी मध्यरात्री धानोरा येथील सागर कोल्हे यांच्या सुभाष किराणा दुकानाला अज्ञात चोरट्यांनी लक्ष्य केले. राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५३ ला लागून असलेल्या दुकानावर दरोडा पडल्याने परिसरातील सुरक्षाव्यवस्थेवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. दुकानातील गल्ल्यातील पैसे चोरीला गेल्याचे प्राथमिक स्वरूपात समोर आले असून, पोलिसांचा तपास पूर्ण झाल्यानंतरच नेमके किती नुकसान झाले हे स्पष्ट होणार असल्याचे दुकानदार सागर कोल्हे यांनी सांगितले. घटनेनंतर पोलिस अधिकारी, फिंगरप्रिंट एक्स्पर्ट पथक, मोबाईल फॉरेन्सिक पथक, ग्रामीण पोलीस निरीक्षक महल्ले, उपविभागीय पोलीस अधिकारी मछरे तसेच पोलिस कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. घटनास्थळाची पाहणी करून पुरावे संकलित करण्याचे काम सुरू करण्यात आले आहे.

**काटीतील घटनेनंतरही धडा नाही?**

काटी गावात काही तासांपूर्वीच अज्ञात आरोपींकडून घरफोडी व दरोड्याची घटना घडली. या घटनेत रायसिंग सिताराम सोळंकी यांचा मृत्यू झाल्याने संपूर्ण ग्रामीण भाग हादरला आहे. ही घटना ताजी असतानाच धानोऱ्यात पुन्हा दरोडा पडल्याने च्च्गुन्हेगारांना पोलिसांचा धाक राहिला आहे का?ज्ज् असा सवाल नागरिक उपस्थित करत आहेत.

**दाभाडीतील गंभीर गुन्ह्याचीही चर्चा**

यापूर्वी दाभाडी गावात शेतमजूर महिलेवर सामूहिक बलात्कार झाल्याची गंभीर घटना समोर आली होती. ग्रामीण भागात खून, दरोडे, चोरी, आर्थिक नुकसान आणि महिलांवरील गंभीर गुन्ह्यांच्या घटना घडत असताना नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या घटनांचा तपास नेमका कुठपर्यंत पोहोचला? आरोपी पोलिसांच्या हाती कधी लागणार? ग्रामीण भागातील नागरिकांना सुरक्षिततेची हमी कोण देणार? असे अनेक प्रश्न आता उपस्थित होत आहेत.

**मीडिया समोर येण्यास पोलिस प्रशासनाचा नकार**

दरम्यान, धानोरा येथील दरोड्याबाबत पोलिस प्रशासनाची अधिकृत भूमिका जाणून घेण्यासाठी माध्यम प्रतिनिधींनी संपर्क साधला असता पोलिस अधिकाऱ्यांनी मीडिया समोर येण्यास नकार दिल्याचे सांगण्यात आले. त्यामुळे या प्रकरणातील नेमकी वस्तुस्थिती, तपासाची दिशा आणि पोलिसांकडे उपलब्ध असलेले धागेदोरे याबाबत नागरिकांसमोर अद्याप स्पष्ट चित्र आलेले नाही.

**नागरिकांचा सवाल—न्याय कधी मिळणार?**

एकीकडे गुन्हे घडत आहेत, दुसरीकडे आरोपी मोकाट असल्याची भावना नागरिकांमध्ये निर्माण होत आहे. खून, दरोडे, चोरी, आर्थिक नुकसान आणि महिलांवरील गंभीर गुन्हे—या घटनांचा तपास कितपत पुढे गेला? याची माहिती नागरिकांना मिळणे आवश्यक आहे.

पोलिस प्रशासनाने केवळ घटनास्थळी पंचनामा व तपासाची प्रक्रिया करण्यापुरते मर्यादित न राहता, गुन्हेगारांचा शोध घेऊन त्यांना कायद्याच्या कचाट्यात आणावे, अशी मागणी ग्रामीण भागातील नागरिकांकडून होत आहे. अवघ्या २४ तासांत दुसरा दरोडा पडल्याने आता हा केवळ एका दुकानाचा प्रश्न राहिलेला नसून, मलकापूर ग्रामीण भागातील कायदा-सुव्यवस्थेचा गंभीर प्रश्न बनला आहे. नागरिकांच्या जीविताची आणि मालमत्तेची सुरक्षा ही पोलिस प्रशासनाची जबाबदारी असून, या घटनांवर ठोस कारवाई करून नागरिकांचा पोलिसांवरील विश्वास पुन्हा निर्माण करण्याचे मोठे आव्हान पोलिस प्रशासनासमोर उभे ठाकले आहे.

### सीसीटीव्ही फुटेज पोलिसांच्या हाती; आरोपींचा शोध घेण्यास मदत

» धानोरा येथील किराणा दुकानावर झालेल्या दरोड्याच्या घटनेनंतर दुकानदार सागर कोल्हे यांच्या दुकानातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे फुटेज पोलिसांना उपलब्ध झाले आहे. या फुटेजमध्ये संशयित आरोपींच्या हालचाली कैद झाल्या असण्याची शक्यता असून, दरोडेखोरांचा शोध घेण्यासाठी हे फुटेज पोलिसांच्या तपासाला महत्त्वाची दिशा देऊ शकते. घटनेनंतर पोलिस अधिकारी, फिंगरप्रिंट एक्स्पर्ट पथक, मोबाईल फॉरेन्सिक पथक, ग्रामीण पोलीस निरीक्षक महल्ले, उपविभागीय पोलीस अधिकारी मछरे तसेच पोलिस कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. घटनास्थळाची पाहणी करून पुरावे संकलित करण्यात आले असून, सीसीटीव्ही फुटेज आणि घटनास्थळावरून मिळणाऱ्या तांत्रिक पुराव्यांच्या आधारे आरोपींपर्यंत पोहोचण्याचे मोठे आव्हान पोलिसांसमोर आहे.

# 16 ऑगस्टपर्यंत करा ई-केवायसी....
# अन्यथा नाही मिळणार गॅसची सबसिडी
## इ- के वायसी न झाल्यास बाजार भावाने विकत घ्यावा लागेल सिलेंडर

प्रतिनिधी ११ ऑगस्ट

**अकोला:** खाडी युद्ध सुरू असल्याने ग्राहकांना आधीच सिलेंडर नोंदणीसाठी 28 दिवसांची प्रतीक्षा करणे भाग पडत आहे. त्यात आता इ केवायसी साठी नवीन नियमावली गॅस कंपन्यांनी जारी केली आहे. नव्या सूचनेनुसार ज्या ग्राहकांचे ई-केवायसी पूर्ण झाले आहे त्यांनाच यापुढे सिलेंडरची सबसिडी मिळणार आहे. यासाठी 16 ऑगस्ट ही अंतिम तारीख देण्यात आली आहे. ई केवायसी ची प्रक्रिया पूर्ण न केलेल्या ग्राहकांना बाजारभावात सिलेंडर घ्यावे लागणार असल्याचे कंपन्यांसह पुरवठा विभागाकडून



स्पष्ट करण्यात आले आहे. जिल्ह्यात मुख्यतः भारत पेट्रोलियम, हिंदुस्तान पेट्रोलियम, तसेच इंडेन कंपन्यांचे लाखो ग्राहक आहेत त्यापैकी अनेक ग्राहकांनी आतापर्यंत ई केवायसी ची प्रक्रिया पूर्ण केली नसल्याने अडचणी निर्माण होणार आहेत. त्यामुळे सबसिडी सुरू ठेवण्यासाठी ही प्रक्रिया करणे आता या कंपन्यांनी बंधनकारक केले आहे. दिलेल्या मुदतीत बायोमेट्रिक व ई केवायसी पडताळणी न करणाऱ्या ग्राहकांना व्यावसायिक दराने सिलेंडर खरेदी करावा लागेल. अंतिम मुदतीपर्यंत ई केवायसी न करणाऱ्यांची सबसिडी तात्पुरती बंद केली जाईल. प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत त्यांना घरगुती दराऐवजी बाजारभावाने सिलेंडर विकत घ्यावा लागेल.

### कुठे करावी ई केवायसी

ग्राहकांनी 16 ऑगस्टपर्यंत दिलेल्या मुदतीत ही ठेवायची प्रक्रिया पूर्ण करावी ही प्रक्रिया पूर्ण केल्यासच त्यांना गॅसची सबसिडी मिळेल अन्यथा बाजार भावाने सिलेंडर विकत घ्यावे लागेल त्यामुळे ग्राहकांनी थेट आपल्या संबंधित गॅस एजन्सी मध्ये जाऊन बायोमेट्रिक मशीनवर अंगठा लावून ही प्रक्रिया मोफत करून घ्यावी तसेच सिलेंडर घरपोच पोचवणाऱ्या डिलिव्हरी बॉय कडे उपलब्ध असलेल्या ॲप मशीन द्वारे ही त्यांना आधार/ पी केवायसी पडताळणी करता येऊ शकेल

### ई केवायसी म्हणजे ग्राहकांची इलेक्ट्रॉनिक ओळख

ई-केवायसी म्हणजे ग्राहकाची इलेक्ट्रॉनिक ओळख पडताळणी. यामध्ये गॅस जोडणी असलेल्या मूळ ग्राहकाचे आधार कार्ड आणि बायोमेट्रिक तपशील जुळवून पाहिले जातात. यामुळे बोगस कनेक्शन रोखण्यास आणि पात्र ग्राहकांपर्यंत सबसिडी पोहोचवण्यास मदत होते

# येत्या गुरुवारपासून सुरु होणार श्रावण महिना
## चारही सोमवारी शहरात दुमदुमणार 'हर हर महादेव'चा जयघोष

प्रतिनिधी ११ ऑगस्ट

**अकोला:** गुरुवारपासून मराठी भाषिकांचा श्रावण महिना सुरू होत आहे. तर आज हिंदी भाषिकांचा दुसरा श्रावण सोमवार होता. श्रावण सोमवारी श्री राजराजेश्वर मंदिर परिसरात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. सकाळपासूनच मंदिर परिसरात भाविकांची गर्दी झाली होती. श्रावण महिन्यामुळे सर्व फूल व प्रसाद विक्रेत्यांचे चांगले दिवस आले आहेत. येत्या गुरुवारपासून मराठी लोकांचा श्रावण महिना सुरू होत आहे. तर दुसरीकडे आज हिंदी भाषिकांचा दुसरा श्रावण सोमवार असल्याने मंदिर परिसरात सकाळी ५:०० वाजल्यापासूनच दर्शनासाठी भाविकांची गर्दी उसळली होती. श्रावण महिन्यात मंदिरात आल्यानंतर सर्व भक्तांना एका अलौकिक अनुभूतीचा लाभ होतो, अशा प्रतिक्रिया काही भक्तांनी व्यक्त केल्या.

मंदिर परिसरात हार-फूल आणि प्रसाद विक्रेत्यांची दुकाने आहेत. गेल्या अनेक वर्षांपासून हे विक्रेते येथे व्यवसाय करून आपला



उदरनिर्वाह करत आहेत. मात्र श्रावण महिना सुरू होताच या सर्व विक्रेत्यांचे चांगले दिवस येतात. सर्वात जास्त मागणी बेलपत्राला असते. परंतु गेल्या काही दिवसांपासून शहरात आयोजित पंडित प्रदीप मिश्रा यांच्या शिवकथेनंतर आता दुर्लक्षित असलेल्या धोत्रा (धतुरा) चे फूल, शमीपत्र, दुर्वा आदींची मागणीही मोठ्या प्रमाणावर वाढली आहे. अशा प्रतिक्रिया देताना या फूल विक्रेत्यांनी सांगितले की, या वर्षी फुले खूप महाग आहेत, तरीही भाविक ती खरेदी करत आहेत. याच व्यवसायावर आमचा आणि आमच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह चालतो. दर सोमवारी श्री राजराजेश्वर मंदिरात महाप्रसादाचे आयोजन केले जाते. मंदिरात येणाऱ्या सर्व भक्तांना या महाप्रसादाचे वाटप केले जाते. सकाळपासूनच महाप्रसाद बनवण्यास सुरुवात होते. सकाळी ११:०० वाजता आरती होताच उपस्थित सर्व भाविकांना महाप्रसाद वाटला जातो. हा महाप्रसाद मिळणे हे देखील मोठ्या भाग्याची गोष्ट आहे, अशा प्रतिक्रिया काही भाविकांनी दिल्या.येत्या गुरुवारपासून मराठी लोकांचा श्रावण महिना सुरू होईल आणि तेव्हा मंदिरात किती मोठा जनसागर उसळतो हे पाहायला मिळेल.

# 24 वर्षीय युवकाचा संशयास्पद मृत्यू

प्रतिनिधी ११ ऑगस्ट

**अकोला:** रामदास पेठ पोलीस स्टेशनच्या हद्दीत येणाऱ्या मुजफ्फरनगर परिसरातील 24 वर्षीय शेख शोएब शेख सलीम कुरेशी या युवकाचा रात्री तीन वाजता मृतदेह आढळून आला.

घटनेमुळे परिसरात वेगवेगळे अफवा पसरल्याने तणावाची स्थिती निर्माण झाली होती मृतकाकाच्या नातेवाईकांनी तसेच काही राजकीय पक्षाच्या नेत्यांनी रामदास पेठ पोलीस स्टेशनमध्ये गर्दी केली होती. रामदास पेठ पोलिसांनी युवकाचा मृतदेह त्वरित पोस्टमार्टम साठी सर्वोपचार रुग्णालयात रवाना केला.

घटनास्थळी पोलिसांनी मृतदेहाची निरीक्षण केले असता त्याला मारहाणीची कुठलीही



निशाणी दिसून न आल्याचे नमूद केले. परंतु यावरही पोलीस मृतक युवकाच्या पोस्टमार्टम रिपोर्टची वाट पाहत आहेत पोस्टमार्टम रिपोर्ट आल्यानंतर सर्व संशय दूर होईल त्यामुळे कोणीही अफवांवर विश्वास ठेवू नये असे आवाहन रामदास पेठ पोलीस स्टेशनचे ठाणेदार शिरीष खंडारे यांनी केले.

# 35 दिवसांपासून पैसे भरुनही सोलर पंप मिळेना
## शेतकरी महावितरणच्या कारभाराने त्रस्त

प्रतिनिधी ११ ऑगस्ट

**अकोला:** शेतकऱ्यांच्या शेताला मुबलक पाणी मिळावे यासाठी सरकारकडून विविध योजना राबवल्या जात असल्याचा दावा केला जात असला, तरी महावितरणच्या भोंगळ कारभारामुळे शेतकऱ्यांना मनस्ताप सहन करावा लागत असल्याचा प्रकार अकोल्यात समोर आला आहे. काजळेश्वर येथील शेतकऱ्याने सोलर पंप मिळवण्यासाठी २५ फेब्रुवारी २०२६ रोजी अर्ज करून ३०,६९४ रुपयांची रीतसर रक्कम भरली होती. त्यानंतर ८ जुलै २०२६ ला रोटोमॅक कंपनीचे सोलर पंप साहित्य पुरवण्यात



आले. हे साहित्य शेतात नेऊन बसवण्याची जबाबदारी संबंधित यंत्रणेची असताना, गाडी शेतात जात नाही असे सांगण्यात आले. त्यामुळे शेतकऱ्याने स्वतः भाड्याने ट्रॅक्टर करून साहित्य आणले. मात्र, साहित्य आणून तब्बल ३५ दिवस उलटले तरी अद्यापही हे सोलर पंप बसवून देण्यात आलेले नाहीत. भाड्याचा ट्रॅक्टरचा खर्च आणि सोलर पंपाची प्रतीक्षा यामुळे शेतकरी हैराण झाला आहे. याप्रकरणी शेतकऱ्याने अकोला येथील महावितरणच्या कार्यकारी अभियंत्यांची प्रत्यक्ष भेट घेऊन २३ जुलैला तक्रार केली होती. त्यावेळी तेथील अधिकाऱ्यांनी दोन दिवसांत काम पूर्ण करण्याचे आश्वासन दिले होते. मात्र, अनेक दिवस उलटूनही प्रत्यक्ष काम सुरू झालेले नाही. गेल्या ८ ते १० दिवसांपासून अकोला जिल्ह्यात पावसाने दडी मारली आहे. विहिरीमध्ये पुरेसे पाणी उपलब्ध असूनही सोलर पंप फीट न झाल्याने पिकांना पाणी देता येत नाहीये. वेळेवर पाणी न मिळाल्यास पिकांचे मोठे नुकसान होण्याची भीती शेतकऱ्याने व्यक्त केली असून, महावितरणने तात्काळ सोलर पंप बसवून द्यावा, अशी मागणी दिनेश राठोड या शेतकऱ्याने केली आहे.

# दीपपूजनाची वेळ

**अकोला:** वैदिक पंचांगानुसार, १२ ऑगस्ट २०२६, बुधवार, सूर्यास्तानंतरचा प्रदोषकाळ, साधारण सायंकाळी ६:४५ ते ८:१५ वाजेपर्यंत दीपपूजन करणे योग्य राहील. या काळात घरातील सर्व दिवे स्वच्छ करून प्रज्वलित करून त्यांची पूजा करता येते. दीपपूजनाची योग्य वेळ निवडताना सूर्यास्तानंतरचा काळ अधिक सोयीचा मानला जातो, कारण दीपपूजेचा मुख्य हेतूच अंधारात प्रकाश प्रज्वलित करून दीपाची पूजा करणे हा आहे. आषाढ अमावस्येला दीपपूजेला विशेष महत्त्व मानले जाते. या दिवशी घरातील दिवे, समई आणि दीप स्वच्छ करून त्यांची पूजा केली जाते. दीप हे प्रकाश, ज्ञान आणि सकारात्मकतेचे प्रतीक मानले जाते.

# श्रीराम राजुरकर यांना आंतरराष्ट्रीय संशोधक सन्मान

प्रतिनिधी ११ ऑगस्ट

**चांदूर रेल्वे :** चांदूर रेल्वे तालुक्यातील राजुरा. येथील रहिवासी श्रीराम अशोक राजुरकर यांनी आपल्या उल्लेखनीय संशोधन कार्याच्या जोरावर जागतिक



स्तरावर मानाचा सन्मान मिळवून तालुक्याचे आणि विदर्भाचे नाव उज्ज्वल केले आहे. वैद्यकीय भौतिकशास्त्र क्षेत्रातील जगातील अत्यंत प्रतिष्ठित संस्था अमेरिकन वैद्यकीय भौतिकशास्त्रज्ञ संघटना तर्फे त्यांना सन २०२६ चा प्रारंभिक कारकीर्द संशोधक प्रवेश सन्मान प्रदान करण्यात आला आहे. हा सन्मान जगभरातील वैद्यकीय भौतिकशास्त्र क्षेत्रात उत्कृष्ट संशोधन करणाऱ्या तरुण संशोधकांना दिला जातो. विशेष म्हणजे, निम्न आणि मध्यम उत्पन्न गटातील देशांमधून दरवर्षी अत्यंत मर्यादित संशोधकांची निवड केली जाते. अशा कठीण आणि जागतिक स्तरावरील स्पर्धेत श्रीराम राजुरकर यांची निवड होणे ही राजुरा गावासाठी मोठ्या अभिमानाची बाब मानली जात आहे. हा सन्मान वैद्यकीय भौतिकशास्त्र मानवकल्याण उपक्रम, जागतिक प्रारंभिक कारकीर्द संशोधक उपसमिती आणि जागतिक प्रतिनिधी उपसमिती यांच्या संयुक्त विद्यमाने प्रदान करण्यात येतो.

# 15 व 16 ऑगस्टला रंगणार 12 वी 'स्वातंत्र्य करंडक' विदर्भस्तरीय मराठी एकांकिका स्पर्धा

प्रतिनिधी ११ ऑगस्ट

**अकोला:** पत्रकार कॉलनी नवयुवक क्रीडा प्रसारक व बहुउद्देशीय संस्था, अकोला संचालित सिद्धी गणेश प्रोडक्शन यांच्या वतीने आयोजित १२ वी स्वातंत्र्य करंडक विदर्भस्तरीय मराठी एकांकिका स्पर्धा दिनांक १५ व १६ ऑगस्ट २०२६ रोजी अकोला येथील प्रमिलाताई ओक हॉल येथे होणार आहे.

विदर्भातील नाट्यसंघांचा या स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असून, विविध जिल्ह्यांतून प्राप्त झालेल्या प्रवेश अर्जांमधून निवडलेल्या २० उत्कृष्ट एकांकिका अंतिम फेरीसाठी पात्र ठरल्या आहेत.

स्पर्धेत प्रथम, द्वितीय, तृतीय पारितोषिकांसह उत्कृष्ट अभिनय, दिग्दर्शन, लेखन, नेपथ्य, प्रकाशयोजना, संगीत आणि इतर विविध वैयक्तिक पारितोषिके प्रदान करण्यात येणार आहेत. चंद्रपूर, नागपूर, अमरावती, वाशिम, बुलढाणा, उमरेड, चांदूर रेल्वे आणि अकोला येथील नाट्यसंघ या स्पर्धेत सहभागी होणार असून, दोन दिवस प्रेक्षकांना दर्जेदार आणि वैविध्यपूर्ण एकांकिकांची पर्वणी अनुभवायला मिळणार आहे.

स्पर्धेचे उद्घाटन १५ ऑगस्ट रोजी सकाळी ९.३० वाजता मान्यवरांच्या उपस्थितीत व परीक्षकांच्या हस्ते होणार आहे. तर १६ ऑगस्ट रोजी सायंकाळी ६.०० वाजता स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ होईल.

अकोला शहरातील रसिक प्रेक्षक, नाट्यप्रेमी तसेच महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी या दोन दिवसीय दर्जेदार नाट्यमहोत्सवाचा लाभ मोठ्या संख्येने उपस्थित राहून घ्यावा, असे आवाहन आयोजक सचिन विजय गिरी व महेश इंगळे यांनी केले आहे.

# शेगांव येथे विश्व बंधुत्व रक्तदान शिबिराचे आयोजन

प्रतिनिधी ११ ऑगस्ट

**शेगांव:** शहरात २३.८.२०२६ रोजी रक्तदान शिबिर आयोजन करण्यात आले आहे . प्रजापिता ब्रह्मा कुमारीज् ईश्वरीय विश्व विद्यालय मुख्यालय माऊंट आबू राजस्थान या आंतर राष्ट्रीय संस्थेच्या समाज सेवा प्रभाग व्दारा संपूर्ण भारता मध्ये विश्व बंधुत्व रक्तदान अभियानाचे आयोजन केलेले आहे. त्या निमित्य शेगाव येथील प्रजापिता ब्रह्मा कुमारीज् ईश्वरीय विश्व विद्यालय या शाखेने



आदरणीय राजयोगिनी ब्रह्मा कुमारी दादी प्रकाशमणी जी च्या पावन स्मृती निमित्य दि. २३.८.२०२६ ला विश्व बंधुत्व रक्तदान शिबिराचे आयोजन केलेले आहे. ठिकाण ब्रह्मा कुमारीज्, बस स्टॅन्ड जवळ मटकरी गल्ली, शेगाव. वेळ - सकाळी ९.०० ते संध्याकाळी ६.०० पर्यंत तरी शहरातील रक्तदान करणाऱ्या तरुण युवकांनी सहभागी होईल रक्तदान करावे असे प्रजापती ब्रह्मा कुमारी विश्वविद्यालय यांच्यावतीने आवाहन करण्यात आले आहे.

# बार्शीटाकळी बस स्टॅन्ड बनले कुत्र्यांचे माहेरघर




## गैरकृत्य करणा-यांचा बनला अड्डा

प्रतिनिधी ११ ऑगस्ट

**बार्शीटाकळी:** येथे शासनाने करोड रुपये खर्च करून बस स्टँड बनवले आहे. पण बस स्टँडवर चौकीदार नाही. त्यामुळे बसस्थानक परिसरात कुत्रे बसलेले असतात. एसटी प्रशासन याकडे दुर्लक्ष करीत असल्याचा आरोप आहे. या बस स्टॅन्ड मध्ये दिग्रस, मानोरा, पुसद, मंगरूळपीर या गावावरून अकोला येथे गाड्या येणे जाणे करत आहे. कोणतीही गाडी बस स्टॅन्ड मध्ये जात नाही. प्रत्येक बस रोडवर उभी राहत असून प्रवासी रोड वरून येणे जाणे करीत आहे. बस स्टॅन्ड फक्त नावापुरते बनले आहे. या बस स्टॅन्ड मध्ये गांजा पिणारे, पत्ते खेळणारे व मोबाईलवर लुडो खेळणारे व्यक्ती बसून राहतात. बस स्टॅन्ड नसून कुत्र्यांचे माहेरघर बनले आहे. बस स्टॅन्ड मध्ये गाड्या उभ्या कराव्या जेणेकरून प्रवाशांना सोयीचे होईल. येथील गैरप्रकार थांबवण्यासाठी संध्याकाळी पहारेकरी बसवावे. महामंडळ अधिकारी व कर्मचारी यांनी लक्ष द्यावे अशी मागणी आहे.

# लीनेस क्लबतर्फे गोरक्षण संस्थेत विशेष तुलादान आणि भव्य गो-सेवा कार्यक्रम संपन्न







प्रतिनिधी ११ ऑगस्ट

**अकोला:** सामाजिक बांधिलकी आणि धार्मिक परंपरेचा सुरेख संगम साधत 'लीनेस क्लब'च्या वतीने गोरक्षण संस्था येथे विशेष तुलादान आणि भव्य गो-सेवा कार्यक्रमाचे अत्यंत उत्साहात व भावपूर्ण वातावरणात आयोजन करण्यात आले होते. क्लबच्या अध्यक्षा ली. राजश्री समनपुरे (जयसवाल) यांच्या अध्यक्षतेखाली हा गरिमामय सोहळा पार पडला.

कार्यक्रमाची सुरुवात विघ्नहर्ता श्री गणेश आणि भगवान श्री दत्तात्रेय यांच्या प्रतिमेचे विधीवत पूजन-अर्चन करून व त्यांना अग्रस्थान देऊन करण्यात आली. यानंतर विद्वान पंडितांच्या वेदघोषात आणि मंत्रोच्चारात डिस्ट्रीक्ट प्रेसिडेंट ली. कल्पनाजी देशमुख यांचे भावपूर्ण तुलादान संपन्न झाले. तुलादानासाठी प्रामुख्याने गूळ आणि पेंडीचा (ढेप) वापर करण्यात आला होता. सनातन धर्म आणि सेवा परंपरेचे पालन करत तुलादानात वापरण्यात आलेला सर्व गूळ आणि इतर सामग्री अत्यंत श्रद्धेने गो-मातेला खाऊ घालण्यात आली. आजच्या आधुनिक युगात वैयक्तिक कौतुक आणि औपचारिक कार्यक्रमांच्या पलीकडे जाऊन सामाजिक व धार्मिक कर्तव्याची जाणीव ठेवणे कौतुकास्पद आहे. लीनेस क्लबने 'तुलादान' सारख्या पारंपरिक विधीला गो-सेवेची जोड देऊन समाजात एक सकारात्मक संदेश दिला आहे. केवळ अन्न किंवा वस्तूंचे दान न करता मूक प्राण्यांच्या सेवेसाठी पुढे येण्याची ही वृत्ती इतर सामाजिक संस्थांसाठी नक्कीच अनुकरणीय आहे.

दान आणि समर्पण वृत्ती

या सेवाकार्यात सदस्यांनी मोलाचे योगदान दिले. ली. रत्नमालाजी रुईकर यांच्याकडून ११ किलो गूळ गो-सेवेसाठी समर्पित करण्यात आला, तर उर्वरित धान्य आणि सामग्री अध्यक्षा ली. राजश्री समनपुरे यांच्याकडून दान करण्यात आली.

कार्यक्रमाच्या यशस्वी सांगतेनंतर ली. सुरेखाजी गुप्ता यांच्यातर्फे उपस्थित सर्व लीनेस भगिनींना केळीचा प्रसाद वाटप करण्यात आला.

प्रमुख उपस्थिती आणि सहभाग

या सोहळ्याला व्हि.एम.पी. ली. उषाजी बाहेती, ली. आशाजी वीरवानी, पीडीपी ली. ताराजी माहेश्वरी यांची विशेष उपस्थिती लाभली. तसेच क्लबच्या सचिव वनिता बिजवे, कोषाध्यक्ष ली. अलका उमाले यांच्यासह ली. संगीता भारती, ली. पुष्पा दौडिया, ली. दीना शाह, ली. अरुंधती शिरसाट, ली. राजश्री देशमुख, ली. इंद्राणी देशमुख, ली. प्रेमा मुंदडा आणि ली. नूपुर समनपुरे या सर्व निष्ठावान सदस्यांनी कार्यक्रमाच्या आयोजनात सक्रिय सहभाग घेतला. सर्व सदस्यांच्या उल्लेखनीय सहकार्यामुळे हा उपक्रम अभूतपूर्व यशासह संपन्न झाला.

# फी हजारोंची; विद्यार्थ्यांच्या सुरक्षेची जबाबदारी कोणाची?
## स्कूल व्हॅनच्या नियमांकडे दुर्लक्ष

प्रतिनिधी ११ ऑगस्ट

**अकोट :** विद्यार्थ्यांकडून हजारो रुपयांची फी वसूल करणाऱ्या खाजगी शाळांनी विद्यार्थ्यांच्या सुरक्षित वाहतुकीची जबाबदारीही तितक्याच गांभीर्याने घेण्याची गरज आहे. शाळेत ये-जा करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी वापरल्या जाणाऱ्या स्कूल व्हॅन, ऑटो व इतर वाहनांमध्ये वाहतूक नियमांचे पालन होत आहे की नाही, याची नियमित तपासणी होणे आवश्यक असताना या प्रश्नाकडे दुर्लक्ष होत असल्याने पालकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.

विद्यार्थ्यांची वाहतूक करणारे अनेक ऑटोचालक आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह याच



रोजगारातून करतात. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या सुरक्षेच्या नावाखाली सरसकट ऑटोचालकांचा रोजगार हिरावून घेणे हा उपाय नाही. मात्र वाहनांची क्षमता, सुरक्षितता आणि आवश्यक नियमांचे पालन होणेही तितकेच महत्त्वाचे आहे

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी सायरन ऑफसेट प्रिंटर्स एमआयडीसी क्र. २ पोलिस स्टेशन समोर ता. जि. अकोला येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले.
■ मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख ■ संपर्क - ०७२४ - २४३५५७३, २४४४७७४ ■ email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642, RRC Helpline No. 8484842135